# महाराष्ट्र राजभवन पत्रिका

2023-2024






राज्यपाल रमेश बैस यांनी एप्रिल ते जुलै २०२३ या चार महिन्यात केलेल्या कार्याचा सचित्र लेखाजोखा असलेल्या 'राजभवन पत्रिका' या डिजिटल पुस्तकाचे प्रकाशन राज्यपालांच्या हस्ते राजभवन येथे करण्यात आले.

Maharashtra Governor Ramesh Bais released the quarterly e - book 'Raj Bhavan Patrika' at Raj Bhavan Mumbai. The e-book gives an account of the programmes and functions attended by the Governor during the period April to July 2023.

पुस्तक सोबत दिलेल्या लिंकवर क्लिक करुन पाहता येईल.

https://heyzine.com/flip-book/c24bb2158e.html

SCAN TO WATCH

महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राजभवन पत्रिका

2023-2024

राज्यपाल श्री रमेश बैस यांच्या महाराष्ट्राच्या राज्यपाल
पदाच्या जुलै - २०२३ ते एप्रिल - २०२४
कालावधीतील कार्य अहवाल

जनसंपर्क शाखा, राजभवन

सत्यमेव जयते

## आभार

**प्रवीण दराडे, भा.प्र.से.**
मा. राज्यपालांचे प्रधान सचिव

**विपीन कुमार सक्सेना, भा.प्र.से. (नि.)**
मा. राज्यपालांचे विशेष सचिव

**श्वेता सिंघल, भा.प्र.से.**
मा. राज्यपालांच्या सह-सचिव

**महेश गोलानी**
मा. राज्यपालांचे विशेष कार्य अधिकारी

**रविंद्र धुरजड**
मा. राज्यपालांचे उपसचिव

**जितेंद्र वाघ**
मा. राज्यपालांचे परिवार प्रबंधक

**डॉ. श्रेणिक लोढा, IPS,** ADC

**ले. विवेक कुमार सिंह, IN,** ADC

**समन्वय**
**उमेश काशीकर**
मा. राज्यपालांचे जनसंपर्क अधिकारी

**छायाचित्रे**
माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन

**मांडणी**
नागोराव रोडेवाड

**ग्राफिक डिझायनर**
निधी बोलार

**विशेष आभार**
रमेश पाटील, धीरज पेडेकर, जनसंपर्क शाखा, राजभवन
राजभवनातील अधिकारी व कर्मचारी

# अनुक्रमणिका
# Index

राष्ट्रीय अतिथी | National Dignitaries

विदेशी उच्चपदस्थ | Foreign Dignitaries

महत्वाचे अभ्यागत | Important Visitors

विकसित भारत संकल्प' यात्रा | Viksit Bharat Sankalp Yatra

राज्य स्थापना दिवस | State Formation Days

शिक्षण | Education

राज्यपालांचे कार्यक्रम | Events and Programmes

जिल्ह्यांना भेटी | Visits to Districts

इतर राज्यांना भेटी | Visits to Other States

राजभवन परिवार | Raj Bhavan Family



# राष्ट्रीय अतिथी

# National Dignitaries


Photograph : Rajesh Waradkar

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे महाराष्ट्र दौऱ्यावर आगमन
# President Droupadi Murmu arrives on State Visit



राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे चार दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यासाठी पुणे येथे आगमन झाले. राज्यपाल रमेश बैस यांनी त्यांचे आगमनप्रसंगी स्वागत केले.
२९ नोव्हेंबर २०२३

President of India Droupadi Murmu arrived in Pune on her 4 - day visit to Maharashtra. State Governor Ramesh Bais welcomed the President.
29 November 2023




राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या १४५ व्या तुकडीच्या पासिंग आऊट परेडचे निरिक्षण केले. यावेळी राज्यपाल रमेश बैस तसेच संरक्षण दलातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.
३० नोव्हेंबर २०२३

The President of India Droupadi Murmu reviewed the Passing Out Parade of 145th Course of National Defence Academy (NDA) at Khadakwasla in Pune. Maharashtra Governor Ramesh Bais, senior officers of the armed forces and their family members were present.
30 November 2023

# राष्ट्रपतींच्या हस्ते नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अमृत महोत्सवाचे उदघाटन

# President Murmu inaugurates Platinum Jubilee of GMC Nagpur






राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व हॉस्पिटलच्या अमृत महोत्सवाचे उदघाटन महाविद्यालय परिसर येथे संपन्न झाले. यावेळी राष्ट्रपतींच्या हस्ते टपाल तिकीट व विशेष आवरणाचे प्रकाशन करण्यात आले.

राज्यपाल रमेश बैस, केंद्रीय मंत्री नितिन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ राज गजभिये, लोकप्रतिनिधी, निमंत्रित, प्राध्यापक, डॉक्टर्स व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.
०१ डिसेंबर २०२३

President of India Droupadi Murmu inaugurated the Platinum Jubilee Celebrations of the Government Medical College and Hospital Nagpur. The President released a postal stamp and special cover on the occasion.

Maharashtra Governor Ramesh Bais, Union Minister Nitin Gadkari, Deputy Chief Minister Devendra Fadnavis, Minister of Medical Education Hasan Mushrif, Dean of the Hospital Dr. Raj Gajbhiye, people's representatives, invitees, doctors and staff were present.
01 December 2023



# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ

# President of India presides over 111th Convocation of Nagpur University




आपल्या स्थापनेचे शताब्दी वर्ष साजरे करीत असलेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा १११ वा दीक्षांत समारंभ राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या प्रमुख उपस्थितीत कविवर्य सुरेश भट सभागृह नागपूर येथे संपन्न झाला. दीक्षांत समारोपाला विद्यापीठाचे कुलपती तसेच राज्यपाल रमेश बैस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आदी प्रामुख्याने उपस्थित होते. या दीक्षांत समारंभात विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखेतून डी.एससी. पदवी प्राप्त करणारे डॉ. रामचंद्र हरीसा तुपकरी आणि डॉ. टि. व्ही. गेडाम सुवर्णपदक आचार्य पदवी प्राप्त विद्यार्थिनी राजश्री ज्योतीदास रामटेके यांना राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

०२ डिसेंबर २०२३

President of India Droupadi Murmu presided over the 111th Convocation Ceremony of the Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University at Kavivarya Suresh Bhat Auditorium in Nagpur.

Maharashtra Governor and Chancellor of universities Ramesh Bais, Union Minister Nitin Gadkari, Deputy Chief Minister Devendra Fadnavis, Higher and Technical Education Minister Chandrakant Patil, Vice Chancellor of the University Dr. Subhash Chaudhary and others were present.

02 December 2023

SCAN TO WATCH



# राष्ट्रपतींच्या हस्ते ‘कैवल्यधाम’च्या शताब्दी सोहळ्याचे उदघाटन

# President of India inaugurates Centenary of ‘Kaivalyadhama’




लोणावळा येथील कैवल्यधाम योग संस्थेच्या शताब्दी सोहळ्याचे उदघाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी राष्ट्रपतींनी ‘शालेय शिक्षणात योगाचा समावेश' या विषयावर चर्चासत्राला संबोधित केले. राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते यावेळी योग विषयावरील तीन पुस्तकांचे प्रकाशन झाले. कार्यक्रमाला महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, माजी केंद्रीय मंत्री व शताब्दी समारोह समितीचे अध्यक्ष सुरेश प्रभू, कैवल्यधामचे अध्यक्ष डॉ ओमप्रकाश तिवारी, सचिव सुबोध तिवारी व निमंत्रित उपस्थित होते.

२९ नोव्हेंबर २०२३

SCAN TO WATCH

President of India Droupadi Murmu inaugurated the Centenary Celebrations of 'Kaivalyadhama' Yoga Sansthan at Lonavala, Dist Pune. The President also addressed the National Conference on 'Integration of Yoga in School Education' on the occasion. Governor Ramesh Bais released 3 books on yoga and presented their first copies to the President. Minister of Women and Child Welfare Aaditi Tatkare, former Union Minister and Chairman of the Kaivalyadhama Centenary Committee Suresh Prabhu, Chairman of Kaivalyadhama O P Tiwari, Secretary Subodh Tiwari and invitees were present.

29 November 2023






# राष्ट्रपतींच्या हस्ते कर्करोगावरील 'CAR - T' सेल थेरपी उपचार प्रणालीचा शुभारंभ

# President of India launches CAR - T cell therapy for Cancer Treatment

भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आयआयटी मुंबई येथे NexCAR 19 या संपूर्ण एकीकृत 'CAR - T' सेल थेरपी प्लॅटफॉर्म या कर्करोगावरील क्रांतिकारक स्वदेशी उपचार प्रणालीचा शुभारंभ करण्यात आला. आयआयटी मुंबई व टाटा मेमोरियल हॉस्पिटल या संस्थांच्या सहकार्याने विकसित CAR - T सेल थेरपीमुळे विशिष्ट कर्करोग रुग्णांना परवडणाऱ्या किंमतीत उपचार घेणे शक्य होणार आहे. कार्यक्रमाला राज्यपाल रमेश बैस, आयआयटी मुंबईचे संचालक शुभाशीस चौधुरी, टाटा मेमोरियल सेंटरचे संचालक प्रा सुदीप गुप्ता, प्रकल्प प्रमुख डॉ राहुल पुरवार, आयआयटी व टाटा हॉस्पिटलचे वरिष्ठ अधिकारी व कर्करोग तज्ज्ञ उपस्थित होते.

०४ एप्रिल २०२४

President of India Droupadi Murmu launched 'NexCAR19', a fully integrated indigenous CAR - T cell therapy platform, a life saving therapy for the masses in India at IIT Bombay, Mumbai. The platform developed through the collaboration between IIT Bombay and Tata Memorial Hospital is regarded as a phenomenal advance in Medical Science. Maharashtra Governor Ramesh Bais, Director of IIT Bombay Prof Subhasis Chaudhuri, Director of Tata Memorial Centre Prof Sudeep Gupta, Project leader Dr Rahul Purwar were prominent among those present.

04 April 2024

SCAN TO WATCH

# उपराष्ट्रपतींच्या उपस्थितीत पीठासीन अधिकाऱ्यांची राष्ट्रीय परिषद संपन्न

# Vice President presides over Conference of Presiding Officers




भारताचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी महाराष्ट्र विधान भवन मुंबई येथे आयोजित ८४ व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषद आणि भारतातील राज्य विधान मंडळांच्या सचिवांच्या ६० व्या परिषदेला संबोधित केले. यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्य विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विविध राज्यांच्या विधान मंडळांचे पीठासीन अधिकारी तसेच राज्य विधिमंडळाचे सदस्य उपस्थित होते.

२८ जानेवारी २०२४

SCAN TO WATCH


Vice President of India Jagdeep Dhankhar addressed the 84th All India Presiding Officers Conference (AIPOC) and 60th Conference of Secretaries of State Legislative Bodies in India at Maharashtra Vidhan Bhavan Mumbai. Maharashtra Governor Ramesh Bais, Lok Sabha Speaker Om Birla, Rajya Sabha Deputy Chairman Harivansh, Deputy Chief Minister of Maharashtra Devendra Fadnavis, Speaker of Maharashtra Legislative Assembly Rahul Narwekar, Deputy Chairperson of Legislative Council Dr Neelam Gorhe, Presiding Officers of various State Legislatures and members of the State Legislature were present.

28 January 2024



# उपराष्ट्रपतींच्या हस्ते श्रीमद राजचंद्र स्मारकाचे उदघाटन संपन्न
# VP inaugurates 'Shrimad Rajchandra Memorial'



राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे अध्यात्मिक गुरु श्रीमद राजचंद्र यांच्या जयंतीचे औचित्य साधून त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ चर्नी रोड स्टेशनजवळ निर्माण करण्यात आलेल्या श्रीमद राजचंद्र स्मारकाचे उदघाटन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी उपराष्ट्रपतींच्या हस्ते ऑपेरा हाऊसच्या मागील मॅथ्यूज रोडचे नामांतर करुन 'श्रीमद राजचंद्र मार्ग' असे करण्यात आले. कार्यक्रमाला राज्यपाल रमेश बैस, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, श्रीमद राजचंद्र मिशन धरमपूरचे अध्यात्मिक प्रमुख गुरुदेवश्री राकेशजी, मिशनचे अध्यक्ष अभय जेसानी, उपाध्यक्ष आत्मप्रीत नेमी व निमंत्रित उपस्थित होते.
२७ नोव्हेंबर २०२३

Vice President of India Jagdeep Dhankhar inaugurated the 'Shrimad Rajchandra Memorial' on the occasion of the birth anniversary of Shrimad Rajchandra, the spiritual guru to Mahatma Gandhi, near Charni Road Station in Mumbai. The Vice President also unveiled a plaque of 'Shrimad Rajchandra Marg' on the erstwhile Mathews Road behind Opera House in Mumbai. Maharashtra Governor Ramesh Bais, Minister of Skill Development Entrepreneurship and Innovation Mangal Prabhat Lodha, spiritual head of Shrimad Rajchandra Mission GurudevShri Rakeshbhai, President of Shrimad Rajchandra Mission Dharampur Abhay Jesani, Vice President Atmapreet Nemi and invitees were present.
27 November 2023

**SCAN TO WATCH**

# उपराष्ट्रपतींच्या उपस्थितीत राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीचा दीक्षांत समारोह संपन्न

# Vice President presides over Valedictory Ceremony at NADT




उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या उपस्थितीत नागपूर येथील राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी येथे भारतीय राजस्व सेवेच्या ७६ व्या तुकडीचा दीक्षांत समारोह संपन्न झाला. या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस, केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाचे अध्यक्ष नितीन गुप्ता, मुख्य प्रशिक्षण महासंचालक सीमांचल दास, राज्यसभा महासचिव पी.सी. मोदी, आयकर प्रशिक्षण महासंचालक आनंद बैवर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

१५ एप्रिल २०२४

Vice-President of India Jagdeep Dhankhar presided over the Valedictory function of the 76th batch of IRS at the National Academy of Direct Taxes in Nagpur. Governor of Maharashtra Ramesh Bais, CBDT Chairman Nitin Gupta, Principal Director General Training Seemanchal Das, Secretary General, Rajya Sabha P.C. Mody, Director General of Income Tax Training Anand Baiwar and others were present.

15 April 2024



# उपराष्ट्रपतींच्या उपस्थितीत नागपूर विद्यापीठाचा शताब्दी समारोह संपन्न

# Vice President attends Centenary of Nagpur University





राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा शताब्दी समारोह उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी विद्यापीठाच्या 'शतदीप पूर्ती' या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी डॉ. (श्रीमती) सुदेश धनखड, राज्यपाल आणि विद्यापीठाचे कुलपती रमेश बैस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विद्यापीठाचे कुलगुरु डॉ सुभाष चौधरी, प्रकुलगुरु डॉ. संजय दुधे व निमंत्रित उपस्थित होते.
०४ ऑगस्ट २०२३

The Centenary Celebrations of Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University were held in the presence of Vice President of India Jagdeep Dhankhar. The Centenary Souvenir 'Shatadeep Purti' was released on the occasion.

Dr (Smt.) Sudesh Dhankhar, State Governor and Chancellor of the University Ramesh Bais, Union Minister Nitin Gadkari, Deputy Chief Minister Devendra Fadnavis, Vice Chancellor of the University Dr. Subhash Chaudhary, Pro Vice-Chancellor Dr. Sanjay Dudhe and invitees were present.
04 August 2023

# पंतप्रधानांची साईबाबा संस्थान मंदिराला भेट
# PM visits Shirdi Saibaba Sansthan





पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिर्डी येथे श्री साईबाबा संस्थान मंदिराला भेट देऊन साईबाबांचे दर्शन घेतले. यावेळी राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आदी उपस्थित होते.
२६ ऑक्टोबर २०२३

Prime Minister Narendra Modi visited Shri Sai Baba Sansthan Temple in Shirdi and had darshan of Sai Baba Samadhi. Maharashtra Governor Ramesh Bais, Chief Minister Eknath Shinde, Dy CM Devendra Fadnavis, Dy CM Ajit Pawar, Minister Radhakrishna Vikhe Patil, former Minister Chandrashekhar Bawankule and others were present.
26 October 2023

SCAN TO WATCH



# पंतप्रधानांच्या हस्ते अटल सागरी सेतूचे उद्घाटन
# PM dedicates Atal Sea Bridge to the nation





अटल बिहारी वाजपेयी शिवडी - न्हावा शेवा अटल सागरी सेतूचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजीत पवार आदी यावेळी उपस्थित होते.
१२ जानेवारी २०२४

Prime Minister Narendra Modi inaugurated the Atal Bihari Vajpayee Sewri - Nhava Sheva Atal Setu. Maharashtra Governor Ramesh Bais, Chief Minister Eknath Shinde, Dy CM Devendra Fadanvis, Dy CM Ajit Pawar were among those present.
12 January 2024

**SCAN TO WATCH**





# सिंधुदुर्ग येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाचे अनावरण

# PM unveils Shivaji Maharaj statue in Sindhudurg

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत सिंधुदुर्ग जिल्यातील राजकोट किल्ला येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुर्णाकृती पुतळयाचे अनावरण करण्यात आले. त्यानंतर तारकर्ली येथे नौसेना दिवस साजरा करण्यात आला. यावेळी राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नारायण राणे, महाराष्ट्र विधान सभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर तसेच नौदलातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन भारतीय नौदल प्रमुख एडमिरल आर. हरी कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली व भारतीय नौसेनेच्या पश्चिम मुख्यालयाचे मुख्य ध्वज अधिकारी, व्हाईस ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांच्या माध्यमातून करण्यात आले.
०४ डिसेंबर २०२३

Prime Minister Narendra Modi unveiled the statue of Chhatrapati Shivaji Maharaj at Rajkot Fort in Sindhudurg and attended the Navy Day celebrations at Tarkarli Beach in Sindhudurg district. The statue unveiling ceremony paid tribute to the rich maritime heritage of Chhatrapati Shivaji Maharaj and his construction of coastal and sea forts. Governor Ramesh Bais, Chief Minister Eknath Shinde, Defence Minister Rajnath Singh, Union Minister Narayan Rane, Deputy Chief Minister Devendra Fadnavis, Deputy Chief Minister Ajit Pawar, Speaker of Maharashtra Legislative Assembly Rahul Narwekar and others were present.
04 December 2023

**SCAN TO WATCH**

# पंतप्रधानांच्या हस्ते ‘विकसित भारत २०४७ : ‘आवाज युवकांचा’ उपक्रमाचा शुभारंभ

# PM inaugurates ‘Viksit Bharat @ 2047 : Voice of Youth’

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून ‘विकसित भारत @2047 : युवकांचा आवाज’ या उपक्रमाचा शुभारंभ केला. यावेळी पंतप्रधानांनी महाराष्ट्र राजभवन येथे राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्यातील विद्यापीठांचे कुलगुरू, शैक्षणिक संस्थांचे प्रमुख आणि प्राध्यापक यांच्यासाठी आयोजित केलेल्या कार्यशाळेला संबोधित केले. राजभवन येथील कार्यशाळेसाठी राज्यातील ६५ विद्यापीठे व शिक्षण संस्थांचे कुलगुरु व विद्यापीठ प्रमुख उपस्थित होते. यावेळी राज्यपालांच्या उपस्थितीत 'सक्षम भारतीय', समृद्ध आणि शाश्वत अर्थव्यवस्था', 'नवसंकल्पना, विज्ञान आणि तंत्रज्ञान', 'सुशासन आणि सुरक्षा', 'जगामधील देशात भारत', 'विकसित भारत निर्मितीसाठी कृषी व पशुसंवर्धनाची भूमिका' व 'विकसित भारत' उद्दिष्टप्राप्तीमध्ये युवकांचा सहभाग या विषयावरील चर्चासत्रांमध्ये विविध विद्यापीठांच्या प्रमुखांनी व कुलगुरूंनी आपापले विचार मांडले. माजी मंत्री व पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कुलपती हर्षवर्धन पाटील, यांसह राज्यातील ४० विद्यापीठांच्या प्रमुखांनी चर्चासत्रात भाग घेतला.

**११ डिसेंबर २०२३**

Prime Minister Narendra Modi launched through virtual mode the initiative 'Viksit Bharat @ 2047 : Voice of Youth' that seeks to involve the youths in transforming universities and colleges to attain the goal of developed nation by 2047. The Prime Minister addressed the workshop of Vice-Chancellors, Heads of public and private universities and educational Institutions organized in Maharashtra Raj Bhavan by State Governor Ramesh Bais. The Governor's address was preceded by panel discussions on the themes of 'Empowered Indians', 'Thriving and Sustainable Economy', 'Innovation, Science and Technology', 'Good Governance and Security', 'India in the World', 'Role of Agriculture and Animal Husbandry in Viksit Bharat' and 'Engaging Youths for Contributing ideas on Viksit Bharat'.

11 December 2023

**SCAN TO WATCH**






# पंतप्रधानांच्या दूरस्थ उपस्थितीत रेल्वे पायाभूत प्रकल्पांचे उदघाटन

# PM dedicates to the nation Railway Infra projects

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून देशभरातील अनेक रेल्वे पायाभूत प्रकल्पांचे उदघाटन, लोकार्पण तसेच पायाभरणी केली. पंतप्रधानांच्या हस्ते यावेळी नव्या मार्गांवर सुरु करण्यात आलेल्या 'वंदे भारत एक्सप्रेस'ला देखील रवाना करण्यात आले. यावेळी पश्चिम रेल्वेच्या वतीने मुंबई सेंट्रल स्थानक येथे झालेल्या कार्यक्रमामध्ये राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते पश्चिम रेल्वेच्या काही स्थानकांवर स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या 'एक स्टेशन एक उत्पादन' योजनेच्या कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री नारायण राणे, राज्याचे कौशल्य मंत्री मंगल प्रभात लोढा, पश्चिम रेल्वेचे अतिरिक्त महाव्यवस्थापक प्रकाश बुटानी तसेच रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

१२ मार्च २०२४

Prime Minister of India Narendra Modi digitally laid the foundation stone, performed the inauguration and dedicated to the nation various infrastructure projects of Indian Railway. The Prime Minister also flagged off the Vande Bharat Express on new routes. At a programme organised by the Western Railway at Mumbai Central Station, Governor Ramesh Bais ,Chief Minister Eknath Shinde, Union Minister for MSME Narayan Rane, Minister of Skills, Innovation and Entrepreneurship Mangal Prabhat Lodha, ADG Western Railway Prakash Butani and others inaugurated the 'one station, one product' outlet.

12 March 2024

**SCAN TO WATCH**






# पंतप्रधानांच्या उपस्थितीत रिझर्व बँकेचा ९० वा वर्धापन दिन

# PM attends RBI @90 programme in Mumbai

भारतीय रिझर्व्ह बँकेने स्थापनेच्या ९० व्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल रिझर्व्ह बँकेतर्फे आयोजित 'RBI@90' कार्यक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत एनसीपीए मुंबई येथे संपन्न झाला. यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते एका विशेष स्मारक नाण्याचे प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाला महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ भागवत कराड, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास, उद्योग जगतातील प्रमुख नेते, वरिष्ठ अधिकारी व निमंत्रित उपस्थित होते.
०१ एप्रिल २०२४

Prime Minister Narendra Modi attended the Opening Ceremony of the commemoration of the 90th Year of the Reserve Bank of India 'RBI@90' at NCPA Mumbai. The Prime Minister released a Commemorative Coin to mark the occasion.

Maharashtra Governor Ramesh Bais, Union Minister of Finance Nirmala Sitharaman, Chief Minister of Maharashtra Eknath Shinde, Union Minister of State for Finance Pankaj Chaudhari, Union MoS Finance Dr Bhagwat Karad, Dy CM Devendra Fadnavis, Dy CM Ajit Pawar, RBI Governor Dr Shaktikanta Das, captains of Indian Industry and Corporate, senior officials and invitees were present.
01 April 2024

SCAN TO WATCH





# अमित शाह यांचे ‘लक्ष्मणराव इनामदार स्मृति व्याख्यान’

# HM Amit Shah delivers ‘Laxmanrao Inamdar Oration’

मुंबई विद्यापीठ व सहकार भारती यांनी आयोजित केलेल्या लक्ष्मणराव इनामदार स्मृति व्याख्यान मालेत केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शहा यांनी पुष्प गुंफले. मुंबई विद्यापीठाच्या सर कावसजी जहांगीर दीक्षांत सभागृहात झालेल्या व्याख्यानमालेला राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री दिलीप वळसे पाटील, चंद्रकांत पाटील व मंगलप्रभात लोढा, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, कुलगुरु डॉ रवींद्र कुलकर्णी, सहकार भारतीचे अध्यक्ष दीनानाथ ठाकुर व महामंत्री डॉ. उदय जोशी आदी उपस्थित होते.

२३ सप्टेंबर २०२३

SCAN TO WATCH

Union Home and Co-operation Minister Amit Shah delivered the 'Laxmanrao Inamdar Memorial Lecture' organized by the University of Mumbai and Sahakar Bharati at the University's Convocation Hall in Mumbai. Maharashtra Governor Ramesh Bais, Chief Minister Eknath Shinde, Ministers Dilip Walse Patil, Chandrakant Patil and Mangal Prabhat Lodha, Speaker Rahul Narwekar, Vice-Chancellor Dr. Ravindra Kulkarni, National President of 'Sahakar Bharati' Dinanath Thakur and General Secretary Dr Uday Joshi were present.

23 September 2023







# राज्यपालांच्या अभिभाषणाने राज्य विधानमंडळाच्या अधिवेशनाला सुरुवात

# Governor inaugurates joint session of Maharashtra State Legislature



राज्यपाल रमेश बैस यांच्या अभिभाषणाने राज्य विधानमंडळाच्या २०२४ वर्षातील पहिल्या अधिवेशनाला सुरुवात झाली. विधान मंडळ प्रांगण येथे आगमन प्रसंगी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ नीलम गोऱ्हे, संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील व मुख्य सचिव नितीन करीर यांनी राज्यपालांचे स्वागत केले.

२० फेब्रुवारी २०२४

Maharashtra Governor Ramesh Bais addressed the first joint session of Maharashtra State Legislature for the year 2024 at Vidhan Bhavan Mumbai. The Governor was welcomed by Speaker of Maharashtra Legislative Assembly Rahul Narwekar, Chief Minister Eknath Shinde, Deputy Chairperson of Legislative Council Dr Neelam Gorhe, Minister of Parliamentary Affairs Chandrakant Patil and Chief Secretary Nitin Kareer.

20 February 2024

SCAN TO WATCH



# शपथविधी समारंभ
# Oath Taking Ceremony

# न्या. देवेंद्र कुमार उपाध्याय यांनी घेतली मुख्य न्यायमूर्ती पदाची शपथ

# Justice Upadhyaya sworn in as Chief Justice of Bombay

अलाहाबाद उच्च न्यायालयातील न्यायाधीश न्या. देवेंद्र कुमार उपाध्याय यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती पदाची शपथ घेतली. राजभवन येथे झालेल्या शपथविधी सोहळयामध्ये राज्यपाल रमेश बैस यांनी न्या. उपाध्याय यांना पदाची शपथ दिली. राज्यपालांच्या पत्नी रामबाई बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, न्या. उपाध्याय यांचे कुटुंबिय, मुंबई व अलाहाबाद उच्च न्यायालयातील न्यायाधीश यावेळी उपस्थित होते.

२९ जुलै २०२३

**SCAN TO WATCH**

Justice Devendra Kumar Upadhyaya, Judge from the Allahabad High Court was sworn in as the Chief Justice of the Bombay High Court at Raj Bhavan Mumbai. Governor Ramesh Bais administered the oath of office to Justice Upadhyaya at a brief swearing-in ceremony.Spouse of the Governor Smt Rambai Bais, Chief Minister Eknath Shinde, Deputy Chief Minister Devendra Fadnavis, Speaker Rahul Narwekar, Minister of Skill Development Mangal Prabhat Lodha, judges of the Bombay and Allahabad High Courts were present.

29 July 2023





# विदेशी उच्चपदस्थ
# Foreign Dignitaries



# भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक यांचे स्वागत

# Governor Bais welcomes Bhutan King

महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेसह भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक यांचे राजभवन, मुंबई येथे महाराष्ट्र शासनाच्या वतीने स्वागत केले. औपचारिक भेटीनंतर राज्यपालांनी भूतान नरेश जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक आणि त्यांच्या शिष्टमंडळाच्या सन्मानार्थ शाही मेजवानीचे आयोजन केले. यावेळी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुंबईचे पालकमंत्री दीपक केसरकर, नेमबाज अंजली भागवत, क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे, अभिनेते प्रशांत दामले, उद्योगपती प्रकाश हिंदुजा, उद्योजक अजय पिरामल तसेच शासनाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

०७ नोव्हेंबर २०२३

Maharashtra Governor Ramesh Bais accompanied by Deputy Chief Minister Devendra Fadnavis accorded a State Reception to the King of Bhutan Jigme Khesar Namgyel Wangchuck at Raj Bhavan Mumbai.

The Governor hosted a State banquet in honour of King Jigme Khesar Namgyel Wangchuck and his accompanying delegation.
07 November 2023

# भूतानचे पंतप्रधान दाशो छेरिंग तोबगे यांचे स्वागत

# Maharashtra Governor welcomes Bhutan PM

महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांनी भारत भेटीवर आलेले भूतानचे पंतप्रधान दाशो छेरिंग तोबगे व त्यांच्या पत्नी ओम ताशी डोमा यांचे महाराष्ट्र राजभवन, मुंबई येथे राज्य शासनाच्या वतीने स्वागत केले. औपचारिक भेटीनंतर राज्यपालांनी पंतप्रधान दाशो छेरिंग तोबगे आणि भूतानच्या शिष्टमंडळाच्या सन्मानार्थ राजभवनातील 'जल विहार' सभागृहात शाही मेजवानीचे आयोजन केले.

१६ मार्च २०२४

Maharashtra Governor Ramesh Bais accorded a formal reception to the Prime Minister of Bhutan, Dasho Tshering Tobgay on his first official visit to India since becoming the Prime Minister at Raj Bhavan Mumbai. Wife of the Prime Minister Aum Tashi Doma and Smt. Rambai Bais were also present.

16 March 2024

SCAN TO WATCH





# सदिच्छा भेट
# Courtesy Call

## Mexican: Governor

मेक्सिकोतील नवेवो लिआन राज्याचे गव्हर्नर सॅम्युएल आलेहान्द्रो गार्सिया सेपूलवेडा यांनी एका शिष्टमंडळासह राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली.
**०७ ऑगस्ट २०२३**

The Governor of the Mexican State of Nuevo Leon Samuel Alejandro Garcia Sepulveda met Maharashtra Governor Ramesh Bais at Raj Bhavan Mumbai
07 August 2023

## Tibetan Parliament

तिबेटच्या १७ व्या निर्वासित संसदेच्या (TPiE) तीन सदस्यांच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी गेशे ल्हारामपा अटुक त्सेटन, धोंडुप ताशी व श्रीमती त्सेरिंग यांगचेन उपस्थित होते.
**२२ जानेवारी २०२४**

A delegation of three Members of the 17th Tibetan Parliament in Exile (TPiE) met Maharashtra Governor Ramesh Bais at Raj Bhavan Mumbai. Geshe Lharampa Atuk Tsetan, Dondup Tashi and Ms Tsering Yangchen were present. This was a courtesy call.
22 January 2024








# UNGA President

संयुक्त राष्ट्र सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष डेनिस फ्रान्सिस यांनी राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी संयुक्त राष्ट्र संघातील भारताच्या स्थायी प्रतिनिधी रुचिरा कंबोज या देखील उपस्थित होत्या.
२६ जानेवारी २०२४

The President of United Nations General Assembly Dennis Francis met Maharashtra Governor Ramesh Bais at Raj Bhavan Mumbai. India's permanent representative to the UN Ruchira Kamboj was also present.
26 January 2024




YouTube
SCAN TO WATCH

# सदिच्छा भेट
# Courtesy Call

## Governor of Victoria

ऑस्ट्रेलियातील व्हिक्टोरिया राज्याच्या गव्हर्नर प्रो. मागरिट गार्डनर यांनी एका शिष्टमंडळासह महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन मुंबई येथे भेट घेतली. यावेळी ऑस्ट्रेलियाच्या मुंबईतील वाणिज्य दूतावासाच्या प्रमुख मॅजेल हिंड, व्हिक्टोरिया गव्हर्नर यांचे सचिव जॉनाथन पॅट्रिक बुर्के, व्हिक्टोरिया राज्याच्या दक्षिण आशिया कमिशनर मिशेल वेड आदी उपस्थित होते.
०६ डिसेंबर २०२३

The Governor of the Australian State of Victoria Prof. Margaret Gardner accompanied by a delegation from Victoria met Maharashtra Governor Ramesh Bais at Raj Bhavan Mumbai.
06 December 2023

## Hungarian Committee Chairman

हंगेरी संसदेच्या परराष्ट्र व्यवहार विषयक समितीचे अध्यक्ष जोल्ट नेमेथ यांनी समितीचे उपाध्यक्ष डॉ ऍटिला टिलकी यांचेसह महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी भारत व हंगेरी मधील सांसदीय सहकार्य तसेच शिक्षण, संस्कृती व कृषी क्षेत्रातील सहकार्य वाढविण्याबाबत चर्चा झाली.

बैठकीला हंगेरीचे मुंबईतील वाणिज्यदूत फेरेंस यारी, परराष्ट्र व्यवहार संसदीय समितीचे सचिव डॉ रॉबर्ट फ्युरेस व अध्यक्षांच्या सचिव आना लॉफ्लर उपस्थित होते.
११ जानेवारी २०२४

Chairman of the Foreign Affairs Committee of the Hungarian National Assembly Zsolt Nemeth MP and Vice Chairman Dr Attila Tilki met Maharashtra Governor Ramesh Bais at Raj Bhavan Mumbai. Matters of strengthening parliamentary cooperation between Hungary and India and enhancing cooperation in Education, Agriculture and Culture were discussed.
11 January 2024





# सदिच्छा भेट
# Courtesy Call

## Diplomats of ASEAN countries

'आसियान' या दक्षिण पूर्व आशियातील दहा देशांच्या संघटनेच्या भारतातील राजदूतांनी तसेच वाणिज्यदूतांनी राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन मुंबई येथे भेट घेतली. यावेळी ब्रुनेई दारूस्सलाम, कंबोडिया, इंडोनेशिया, लाओस, मलेशिया, म्यानमार, सिंगापूर, थायलंड व व्हिएतनाम देशांचे राजदूत तसेच वाणिज्यदूत व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. **१७ ऑक्टोबर २०२३**

Ambassadors and Consuls of the Association of South East Asian Nations (ASEAN) met Maharashtra Governor Ramesh Bais at Raj Bhavan Mumbai.
17 October 2023

## Ambassador of Brazil

ब्राझीलचे भारतातील नवनियुक्त राजदूत केनेथ दा नॉब्रेगा यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली. बैठकीला ब्राझीलचे भारतातील व्यापार प्रतिनिधी वॅग्नार सिल्व्हा इ एंट्यून्स तसेच कृषी सल्लागार अँजेलो डे केईरोस मॉरिसिओ उपस्थित होते.
**२७ सप्टेंबर २०२३**

The newly appointed ambassador of Brazil in India Kenneth H. da Nobrega called on Maharashtra Governor Ramesh Bais at Raj Bhavan Mumbai.
27 September 2023





# सदिच्छा भेट
# Courtesy Call

## Consul General : Indonesia

इंडोनेशियाचे मुंबईतील नवनियुक्त वाणिज्यदूत एडी वर्दोयो यांनी राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली.
**०८ नोव्हेंबर २०२३**

The newly appointed Consul General of Indonesia in Mumbai Eddy Wardoyo called on Maharashtra Governor Ramesh Bais at Raj Bhavan, Mumbai.
08 November 2023

## Consul General : Hungary

हंगेरीचे मुंबईतील वाणिज्यदूत फेरेन्स यारी यांनी राज्यपाल रमेश बैस यांची महाराष्ट्र राजभवन येथे सदिच्छा भेट घेतली.
**०८ जानेवारी २०२४**

The Consul General of Hungary in Mumbai Ferenc Jari called on the Governor of Maharashtra Ramesh Bais at Raj Bhavan, Mumbai. This was a courtesy call.
08 January 2024





# सदिच्छा भेट
# Courtesy Call

## Consul General : France

फ्रान्सचे मुंबईतील वाणिज्यदूत जॉन मार्क सेर – शार्ले यांनी घेतली राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन येथे सदिच्छा भेट घेतली.
**१६ ऑक्टोबर २०२३**

The Consul General of France in Mumbai Jean-Marc Sere-Charlet called on Governor Ramesh Bais at Raj Bahvan, Mumbai.
16 October 2023

## Consul General : Australia

ऑस्ट्रेलियाचे मुंबईतील नवनियुक्त वाणिज्यदूत पॉल मर्फी यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली.
**२१ मार्च २०२४**

The newly appointed Consul General of Australia in Mumbai Paul Murphy met Maharashtra Governor Ramesh Bais at Raj Bhavan Mumbai. This was a courtesy call.
21 March 2024











# अमेरिका व राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरुंची बैठक संपन्न

# Heads of US Universities meet State VCs

अमेरिका व महाराष्ट्रातील विद्यापीठांमध्ये शैक्षणिक तसेच संशोधन सहकार्य वाढावे या दृष्टीने अमेरिकेतील तसेच राज्यातील विविध विद्यापीठांच्या कुलगुरुंची तसेच विद्यापीठ प्रमुखांची बैठक राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत राजभवन मुंबई येथे संपन्न झाली.

बैठकीला अमेरिकेचे मुंबईतील वाणिज्यदूत माईक हँकी, अमेरिकेतील १४ विद्यापीठांचे अध्यक्ष व प्रतिनिधी तसेच राज्यातील काही पारंपरिक विद्यापीठांचे कुलगुरु, शासनाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी, अमेरिकन दूतावासातील सांस्कृतिक सहकार्य प्रतिनिधी सीता रायटर, IIE चे अध्यक्ष विवेक मनसुखानी, सह अध्यक्ष जेसन सिझ, आदी उपस्थित होते.
२९ फेब्रुवारी २०२४

SCAN TO WATCH

A high level meeting between Heads of 14 Universities in the United States of America and Vice Chancellors of traditional state universities in Maharashtra was chaired by Maharashtra Governor and Chancellor of Universities Ramesh Bais at Raj Bhavan Mumbai.

The Roundtable meeting was organized at the instance of the U.S. Consulate General in Mumbai by the Institute of International Education to promote academic and research collaboration between the universities in the USA and those in Maharashtra.
29 February 2024

# डेन्मार्क संसदेच्या उपाध्यक्ष्यांनी घेतली राज्यपालांची भेट

# Denmark Parliament Deputy Speakers meet Governor

डेन्मार्क संसदेचे तीन उपाध्यक्ष लिफ लान जेन्सेन, जेप्पे सो व करीना ऍ‍ड्सबोल यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली.

भारत - डेन्मार्क राजनैयिक संबंध स्थापनेस ७५ वर्षे पूर्ण झाली असून उभय देशांमध्ये संसदीय सहकार्य, व्यापार, हरित ऊर्जा, शिक्षण व सांस्कृतिक संबंध वाढविण्याच्या उद्देशाने भेटीचे आयोजन केले असल्याचे उपाध्यक्ष लिफ लान जेन्सेन यांनी राज्यपालांना सांगितले.

बैठकीला डेन्मार्कचे भारतातील राजदूत फ्रेडी स्वेन, डेन्मार्क संसदेचे वरिष्ठ अधिकारी व डेन्मार्कचे मुंबईतील उप वाणिज्यदूत हेन्री करकाडा उपस्थित होते.
८ मार्च २०२४

Three Deputy Speakers of Danish Parliament Leif Lahn Jensen, Jeppe Soe and Karina Adsbol met Maharashtra Governor Ramesh Bais at Raj Bhavan Mumbai.

According to Deputy Speaker Leif Lahn Jensen, India and Denmark are celebrating 75 years of diplomatic relations this year. He said the delegation is visiting India to promote parliamentary cooperation, trade, business, cultural and academic collaboration.

The Ambassador of Denmark in India Freddy Svane, Senior officials of Denmark parliament and Vice Consul of Denmark in Mumbai Henry Karkada were present.
8 March 2024





# महत्वाचे अभ्यागत

# Important Visitors

# सदिच्छा भेट
# Courtesy Call



## Governor : Himachal Pradesh

हिमाचल प्रदेशचे राज्यपाल शिव प्रताप शुक्ला - **१५ सप्टेंबर २०२३**

Governor of Himachal Pradesh Shiv Pratap Shukla-15 September 2023



## Governor : Punjab

पंजाबचे राज्यपाल बनवारीलाल पुरोहित **१७ सप्टेंबर २०२३**

Governor of Punjab Banwarilal Purohit - 17 September 2023



## Governor : Gujarat

गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत - **०७ नोव्हेंबर २०२३**

Gujarat Governor Acharya Devvrat - 07 November 2023



## Lt. Governor : A&N

अंदमान आणि निकोबारचे नायब राज्यपाल एडमिरल डी के जोशी (सेवानिवृत्त) १७ ऑक्टोबर २०२३

Lt. Governor of Andaman and Nicobar Islands Admiral D. K. Joshi, PVSM, AVSM, YSM, NM, VSM (Retd.) 17 October 2023

# सदिच्छा भेट
# Courtesy Call



## Governor : Rajasthan

राजस्थानचे राज्यपाल कलराज मिश्र -
**२२ नोव्हेंबर २०२३**

Governor of Rajasthan Kalraj Mishra -
22 November 2023



## Governor : Haryana

हरियाणाचे राज्यपाल बंडारू दत्तात्रेय - **०३ ऑक्टोबर २०२३**

Haryana Governor Bandaru Dattatraya - 03 October 2023



## Governor : Jharkhand

झारखंडचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन - **१५ जानेवारी २०२४**

Governor of Jharkhand C. P. Radhakrishnan -
15 January 2024



## Governor : Tamil Nadu

तामिळनाडूचे राज्यपाल आर एन रवी - ३० जानेवारी २०२४

Governor of Tamil Nadu R. N. Ravi - 30 January 2024

# सदिच्छा भेट
# Courtesy Call



## Governor : Meghalaya

मेघालयचे राज्यपाल फागु चौहान - **०२ फेब्रुवारी २०२४**

The Governor of Meghalaya Fagu Chauhan -
02 February 2024



## Governor : Karnataka

कर्नाटकचे राज्यपाल थावर चंद गेहलोत - **२ मार्च २०२४**

Governor of Karnataka Thaawar Chand Gehlot -
02 March 2024



## Union Minister : Arjun Ram Meghwal

केंद्रीय विधी व न्याय राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल **१९ फेब्रुवारी २०२४**

Union Minister of State for Law and Justice (I/C)
Arjun Ram Meghwal 19 February 2024



## Governor : West Bengal

पश्चिम बंगालचे राज्यपाल डॉ. सी. व्ही. आनंद बोस. **७ मार्च २०२४**

Governor of West Bengal Dr. C.V. Ananda Bose 7 March 2024

# सदिच्छा भेट
# Courtesy Call



## Speaker of Chhattisgarh : Dr Raman Singh

छत्तीसगड विधानसभेचे अध्यक्ष व माजी मुख्यमंत्री डॉ रमण सिंह - १८ मार्च २०२४

Speaker of the Chhattisgarh Legislative Assembly and former Chief Minister Dr Raman Singh - 18 March 2024



## Archbishop

मुंबईचे आर्चबिशप कार्डिनल ऑस्वल्ड ग्रेशियास - २५ सप्टेंबर २०२३

Archbishop of Bombay Cardinal Oswald Gracias- 25 September 2023



## Lokayukta : VM Kanade

राज्याचे लोकायुक्त न्या. विद्यासागर कानडे (निवृत्त) यांनी उपलोकायुक्त संजय भाटिया यांच्यासह राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन येथे भेट घेऊन त्यांना लोकायुक्त व उपलोकायुक्त यांच्या कामकाजासंबंधीचा ४९ वा वार्षिक एकत्रित अहवाल सादर केला.
११ नोव्हेंबर २०२३

The Lokayukta of Maharashtra Justice V M Kanade (retd.) met Maharashtra Governor Ramesh Bais and presented to him the report of the performance of Lokayukta and Upa Lokayukta for the year 2021 at Raj Bhavan Mumbai. Upa Lokayukta Sanjay Bhatia was also present
11 November 2023

# विकसित भारत संकल्प यात्रा

# Viksit Bharat Sankalp Yatra









# डहाणू येथे 'विकसित भारत संकल्प यात्रा'महाशिबीर संपन्न

# Governor flags off 'Viksit Bharat Sankalp Yatra' in Dahanu

राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत पालघर जिल्ह्यातील डहाणू येथे 'विकसित भारत संकल्प यात्रा' महाशिबीर संपन्न झाले. यावेळी केंद्र शासनाच्या विविध योजनांच्या लक्षित लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरुपात योजनांचे लाभ देण्यात आले. कार्यक्रमाला केंद्रीय पंचायती राज राज्यमंत्री कपिल पाटील, पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण, खासदार राजेंद्र गावित, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, आमदार विनोद निकोले, जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

२० नोव्हेंबर २०२३

Maharashtra Governor Ramesh Bais attended the 'Viksit Bharat Sankalp Yatra' Mahashibir for Palghar district at St. Mary's High School, Masoli Mahavidyalaya Area in Dahanu, Dist Palghar. Union Minister of State for Panchayati Raj Kapil Patil, Palghar District Guardian Minister Ravindra Chavan, MP Rajendra Gavit, Zilla Parishad President Prakash Nikam, MLA Vinod Nikole, senior officials of the district administration and citizens attended the programme.

20 November 2023

SCAN TO WATCH







# राज्यपालांच्या हस्ते भंडारा येथे विकसित भारत संकल्प यात्रा महाशिबिराचे उद्घाटन

# Governor Bais flags off 'Viksit Bharat Sankalp Yatra' in Bhandara

राज्यपाल रमेश बैस यांनी भंडारा जिल्हा येथे विकसित भारत संकल्प यात्रेअंतर्गत डिफेन्स अकादमी भंडारा येथे केंद्र तसेच राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती देणाऱ्या महाशिबिराचे उद्घाटन केले. यावेळी राज्यपालांनी विकसित भारत संकल्प यात्रेला हिरवी झेंडी दाखवून रवाना केले. यावेळी राज्यपालांच्या हस्ते प्रधानमंत्री आवास योजना, 'उमेद' जीवनोन्नती अभियान, प्रधानमंत्री सन्मान योजना, जल जीवन मिशन, प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना, यांसह विविध योजनांमधील लक्षित लाभार्थ्यांना योजनांचे लाभ प्रतिनिधिक स्वरुपात देण्यात आले. कार्यक्रमाला भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. विजयकुमार गावित, खासदार सुनील मेंढे, आमदार नरेंद्र भोंडेकर, माजी मंत्री परिणय फुके, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, पोलीस महानिरीक्षक छेरिंग दोरजे तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

०८ डिसेंबर २०२३

Maharashtra Governor Ramesh Bais inaugurated the Viksit Bharat Sankalp Yatra Mahashibir and flagged off the 'Viksit Bharat Sankalp Yatra' for Bhandara district at Defense Academy Bhandara. The mega camp was organized to inform people about the various schemes of the Central and State Governments. Bhandara District Guardian Minister Dr. Vijay Kumar Gavit, MP Sunil Mendhe, MLA Narendra Bhondekar, former Minister Parinay Phuke, Collector Yogesh Kumbhejkar, Inspector General of Police Chhering Dorje and a large number of citizens were present.

8 December 2023

**SCAN TO WATCH**





# मावळ येथे 'विकसित भारत संकल्प यात्रा' महाशिबीर संपन्न

# Governor flags off the 'Viksit Bharat Sankalp Yatra' in Maval

राज्यपाल रमेश बैस यांनी विकसित भारत संकल्प यात्रेअंतर्गत मावळ येथील कान्हे गावात आयोजित महाशिबीराचे उद्घाटन केले. मावळ तालुक्यातील ग्रामीण भागात फिरुन केंद्र शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती देणाऱ्या 'आपला भारत, विकसित भारत' या चित्ररथाला राज्यपालांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून मार्गस्थ करण्यात आले. यावेळी राज्यपालांच्या हस्ते २० लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरुपात विविध योजनांच्या लाभाचे वाटप करण्यात आले. राज्यपालांनी केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची माहिती देणाऱ्या स्टॉलला भेट दिली आणि उपस्थितांशी संवाद साधला.

१७ जानेवारी २०२४

SCAN TO WATCH

Maharashtra Governor Ramesh Bais flagged off the 'Viksit Bharat Sankalp Yatra' for Pune district at Kanhe Village, Maval Tehsil in Pune. The Governor handed over the benefits of various schemes to 20 selected beneficiaries. The Governor also visited the stalls providing information about various schemes of the central and state government and interacted with the people. CEO of Zilla Parishad Pune Ramesh Chavan, Deputy Superintendent of Police Satyasai Karthik, SDO Surendra Navale, Project Director of Rural Development Shalini Kadu and others were present.

17 January 2024

# राज्य स्थापना दिवस

# State Formation Days







# हरियाणा कर्नाटक, केरळ, पंजाब, तामिळनाडू राज्य स्थापना दिवस साजरा

# Haryana, K'taka, Kerala, Punjab & TN State Formation Day

राज्यपाल रमेश बैस यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राजभवन येथे प्रथमच हरियाणा, कर्नाटक, केरळ, पंजाब व तामिळनाडू या राज्यांचा, तसेच अंदमान व निकोबार, चंदीगड, दिल्ली, लक्षद्वीप व पुडुचेरी या केंद्रशासित प्रदेशांचा स्थापना दिवस साजरा करण्यात आला. 'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमा अंतर्गत राज्य व केंद्रशासित प्रदेशांचे स्थापना दिवस साजरे करण्यात आले. यावेळी एसएनडीटी महिला विद्यापीठ व डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी विविध राज्यांची व केंद्रशासित प्रदेशांची लोकगीते व नृत्ये सादर केली. राज्यपालांच्या हस्ते संगीतकार अनू मलिक, 'बामू'चे प्रकुलगुरु प्रो. श्याम शिरसाठ, एसएनडीटी महिला विद्यापीठाचे कुलसचिव विलास नांदवडेकर, विद्यार्थी कल्याण अधिकारी नितीन प्रभुतेंडुलकर तसेच 'बामू'चे संपर्क अधिकारी मुस्तजीब खान यांचा सत्कार करण्यात आला.

०१ नोव्हेंबर २०२३

The Foundation Day of the states of Haryana, Karnataka, Kerala, Punjab and Tamil Nadu was celebrated in Maharashtra Raj Bhavan in presence of Governor Ramesh Bais. The Union Territory Formation Day of Andaman and Nicobar, Chandigarh, Delhi, Lakshadweep and Puducherry was also celebrated. This was for the first time that the State Formation Day of the above-mentioned States and Union territories was celebrated in Maharashtra Raj Bhavan. The programme was organized as part of the 'Ek Bharat Shreshtha Bharat' initiative of Government of India.

01 November 2023

**SCAN TO WATCH**






# छत्तीसगढ, मध्यप्रदेश व आंध्रप्रदेश राज्य स्थापना दिवस साजरा

# Chhattisgarh, MP and Andhra Pradesh State Formation Day

एक भारत श्रेष्ठ भारत उपक्रमाचा भाग म्हणून महाराष्ट्र राजभवन येथे राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रथमच छत्तीसगढ, मध्यप्रदेश व आंध्रप्रदेश या तीन राज्यांचा राज्य स्थापना दिवस साजरा करण्यात आला.
यावेळी दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर यांच्या माध्यमातून चित्रोत्पला लोककला परिषदेच्या वतीने छत्तीसगढ येथील कलाकारांनी लोकनृत्य व लोकगीतांचा कार्यक्रम सादर केला तर मध्य प्रदेश येथील कलाकारांतर्फे कबीर गायन (माळवा शैली) सादर करण्यात आले. 'तेलुगु कला समिती'च्या वतीने कुचिपुडी नृत्यांगना नादिया यांनी नृत्य सादर केले. यावेळी राज्यपालांच्या हस्ते चित्रपट कलाकार सुमन तलवार, चित्रोत्पला लोककला परिषदेचे संचालक राकेश तिवारी, तेलुगू कला समितीचे एम के रेड्डी व कुचिपुडी नृत्यांगना नादिया यांचा राज्यपालांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.
०१ नोव्हेंबर २०२३

The State Formation Day of Chhattisgarh, Madhya Pradesh and Andhra Pradesh was celebrated for the first time in Maharashtra Raj Bhavan in the presence of State Governor Ramesh Bais. The programme was organized as part of the 'Ek Bharat Shreshtha Bharat' initiative of Government of India. A cultural programme comprising folk songs and dance from Chhattisgarh, Kabir Gayan (Malava style) by artists from Madhya Pradesh and Kuchipudi dance by Nadiya was presented.
01 November 2023

**SCAN TO WATCH**









# जम्मू व काश्मीर, लद्दाख केंद्रशासित प्रदेश स्थापना दिवस साजरा

# J & K and Ladakh Union Territories Formation Day

राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत जम्मू व काश्मीर तसेच लद्दाख केंद्रशासित प्रदेशांचा स्थापना दिवस राजभवन येथे साजरा करण्यात आला. 'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमांतर्गत हा स्थापना दिवस साजरा करण्यात आला. यावेळी लद्दाख येथील पर्यटन व सांस्कृतिक विभागाच्या वतीने आलेल्या कलाकारांच्या चमूने तसेच मुंबई विद्यापीठाच्या युवा कलाकारांनी जम्मू व काश्मीर तसेच लद्दाखच्या लोक संस्कृतीचे दर्शन घडविणारा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत लद्दाखचे जाब्रो लोकनृत्य, हाफिजा नृत्य, कव्वाली, माता वैष्णोदेवी गीत, लोकवाद्य संगीत आदी कार्यक्रम सादर करण्यात आले.

३१ ऑक्टोबर २०२३

The Foundation Day of the Union Territories of Jammu and Kashmir, and Ladakh was celebrated in Maharashtra Raj Bhavan in the presence of Maharashtra Governor Ramesh Bais. The Union Territory Formation Day of Jammu and Kashmir, and Ladakh was celebrated as part of the 'Ek Bharat Shreshtha Bharat' initiative of Government of India. A cultural programme depicting the rich culture and traditions of Jammu and Kashmir and Ladakh was presented on the occasion. Folk dance and folk music of Ladakh, the Hafiza dance, Jobro Folk Dance, Mata Vaishno Devi song, Kawwali and other cultural programs were presented.

31 October 2023

**SCAN TO WATCH**









# ‘उत्तराखंड राज्य स्थापना दिवस’ साजरा
# Uttarakhand State Foundation Day

राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र राजभवन येथे प्रथमच 'उत्तराखंड राज्य स्थापना दिवस' साजरा करण्यात आला. यावेळी मुंबईतील उत्तराखंडी लोकांच्या 'गढवाल भ्रातृ मंडल', 'हिमालय पर्वतीय संघ' व 'कौथिग फाउंडेशन' या संस्थांच्या माध्यमातून उत्तराखंडच्या लोक संस्कृतीचे दर्शन घडविणारा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. यावेळी उत्तराखंडचे मांगल गीत, पूजा नृत्य, कुमाऊंनी झोडा नृत्य, लोकगीत, जौनसारी लोकनृत्य, एकल नृत्य आदी कार्यक्रम सादर करण्यात आले.

०९ नोव्हेंबर २०२३

The State Foundation Day of Uttarakhand was celebrated in Maharashtra Raj Bhavan in the presence of Maharashtra Governor Ramesh Bais. A cultural programme depicting the rich culture and traditions of Uttarakhand was presented on the occasion. The Cultural programme was presented by Garhwal Bhratri Mandal, Himalaya Parvatiya Sangha and Kauthig Foundation.

09 November 2023

**SCAN TO WATCH**






# झारखंड राज्य स्थापना दिवस साजरा
# Jharkhand State Formation Day

राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र राजभवन येथे प्रथमच 'झारखंड राज्य स्थापना दिवस' साजरा करण्यात आला. यावेळी झारखंड सरकारचे सांस्कृतिक संचालनालय, जय फाउंडेशन व रुद्र प्रतिष्ठान या संस्थांच्या माध्यमातून झारखंडच्या लोक संस्कृतीचे दर्शन घडविणारा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. यावेळी छट पूजा, छउ नृत्य, कावड यात्रा, पैका नृत्य, फगुआ नृत्य, करम नृत्य, माघे नृत्य आदी कार्यक्रम सादर करण्यात आले.

**१५ नोव्हेंबर २०२३**

The State Formation Day of Jharkhand was celebrated for the first time in Maharashtra Raj Bhavan in the presence of Maharashtra Governor Ramesh Bais. A cultural programme depicting the rich culture and traditions of Jharkhand was presented on the occasion. The Cultural programme was presented by the artists sent by the Directorate of Cultural Affairs, Jharkhand.

15 November 2023

SCAN TO WATCH





# मणिपुर, मेघालय व त्रिपुरा या तीन राज्यांचा राज्य स्थापना दिवस साजरा

# Foundation Day of Manipur, Meghalaya and Tripura

'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमा अंतर्गत महाराष्ट्र राजभवन येथे राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत मणिपुर, मेघालय व त्रिपुरा या तीन राज्यांचा राज्य स्थापना दिवस साजरा करण्यात आला. त्रिपुरा येथून आलेल्या कलाकारांनी त्रिपुरा राज्याची लोकनृत्ये व संगीत सादर केले, तर मुंबईतील एचएसएनसी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी मणिपुर व मेघालय राज्यांचे लोकनृत्य सादर केले.

२१ जानेवारी २०२४

SCAN TO WATCH

The Foundation Day of Manipur, Meghalaya and Tripura was celebrated for the first time in Maharashtra Raj Bhavan in presence of State Governor Ramesh Bais. A cultural troupe from Tripura presented the folk dance and music of Tripura. Students of the HSNC University presented a cultural programme depicting the songs and dance of Manipur and Meghalaya. Vice Chancellor of HSNC University Dr Hemlata Bagla, Chairman of Amazing Namaste Foundation Atul Kulkarni, invitees from North Eastern States, members of faculty and students of HSNC University were present.

21 January 2024




# उत्तर प्रदेश राज्य स्थापना दिवस साजरा
# Uttar Pradesh State Formation Day

राज्यपाल रमेश बैस यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राजभवन मुंबई येथे 'उत्तर प्रदेश राज्य स्थापना दिवस' साजरा करण्यात आला. 'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमांतर्गत यंदा प्रथमच महाराष्ट्र राजभवन येथे उत्तर प्रदेश राज्य स्थापना दिवस साजरा करण्यात आला. यावेळी राज्य कौशल्य विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी उत्तर प्रदेशच्या संस्कृतीचे दर्शन घडवणारा नृत्यावर आधारित कार्यक्रम सादर केला. यावेळी कथक नृत्य, कजरी, ब्रज की होली व रामलीला सादर केले.
२४ जानेवारी २०२४

The Foundation Day of Uttar Pradesh was celebrated for the first time in Maharashtra Raj Bhavan in presence of State Governor Ramesh Bais. A cultural programme depicting Kajri, Braj Ki Holi, Ram Leela and Kathak was presented by the students of Maharashtra State Skill University on the occasion.
24 January 2024

SCAN TO WATCH



# अरुणाचल प्रदेश व मिझोरम राज्य स्थापना दिवस साजरा

# State Foundation Day of Arunachal Pradesh and Mizoram

राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र राजभवन येथे प्रथमच अरुणाचल प्रदेश व मिझोरम राज्य स्थापना दिवस साजरा करण्यात आला. यावेळी अरुणाचल प्रदेश व मिझोरम राज्यांच्या संस्कृतीचे दर्शन घडविणारा लोक गीत नृत्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. डॉ होमी भाभा राज्य विद्यापीठाच्या वतीने हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला.
२० फेब्रुवारी २०२४

The State Foundation Day of Arunachal Pradesh and Mizoram was celebrated for the first time in Maharashtra Raj Bhavan in the presence of Maharashtra Governor Ramesh Bais. A cultural programme depicting the culture, folk dance and traditions of Arunachal Pradesh and Mizoram was presented on the occasion.
20 February 2024

SCAN TO WATCH



# शिक्षण

# Education



# सावित्रीबाई फुले विद्यापीठाचा १२३ वा पदवीप्रदान समारंभ संपन्न

# Convocation Ceremony of Savitribai Phule Pune University

राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा १२३ वा दीक्षांत समारंभ विद्यापीठ परिसरात संपन्न झाला. भारतीय सांस्कृतिक संबंध परिषददेचे माजी अध्यक्ष डॉ विनय सहस्त्रबुध्दे यांचे यावेळी दीक्षांत भाषण झाले. यावेळी राज्यपालांच्या हस्ते रिद्धी सुनील कलंत्री (राष्ट्रपती शंकर दयाल शर्मा सुवर्ण पदक), प्राजक्ता पाठारे ('कमवा व शिका' योजनेअंतर्गत पदक), विवेक वारभुवन (डॉ पी सी अलेक्झांडर अंतर विद्यापीठ मराठी वक्तृत्व स्पर्धा सुवर्ण पदक), यांसह गुणवत्ता प्राप्त स्नातकांना पदके प्रदान करण्यात आली. दीक्षांत समारोहाला कुलगुरु प्रा. डॉ. सुरेश गोसावी, प्र.कुलगुरु प्रा. डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ विजय खरे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ महेश काकडे प्रामुख्याने उपस्थित होते.
१७ जानेवारी २०२४

Maharashtra Governor and Chancellor of the state universities Ramesh Bais presided over the 123rd Convocation Ceremony of Savitribai Phule Pune University in the University Campus in Pune. The Governor presented Gold Medals to meritorious students on the occasion. Former President of Indian Council for Cultural Relations Dr. Vinay Sahasrabudhe delivered the Convocation address. Vice Chancellor Prof Dr Suresh Gosavi, Pro Vice Chancellor Prof. Dr. Parag Kalkar, In-charge Registrar Dr Vijay Khare, Director of Examination and Evaluation Board Dr Mahesh Kakade, graduating students and parents were present.
17 January 2024

SCAN TO WATCH





# राज्यपालांच्या उपस्थितीत मुंबई विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ संपन्न

# Governor presides over Convocation of Mumbai University

मुंबई विद्यापीठाचा वार्षिक दीक्षान्त समारंभ राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यापीठाच्या सर कावसजी जहांगीर दीक्षान्त सभागृहात संपन्न झाला. दीक्षान्त समारंभाला राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष प्रा. एम. जगदीश कुमार, कुलगुरु प्रा. रविंद्र कुलकर्णी, प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड व्यासपीठावर प्रामुख्याने उपस्थित होते. यंदा पद्म भूषण पुरस्कार जाहीर झालेले उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल राम नाईक व पद्मश्री पुरस्कार जाहीर झालेले डॉ झहीर काझी व उदय देशपांडे हे विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

०७ फेब्रुवारी २०२४

SCAN TO WATCH

Governor and Chancellor of universities Ramesh Bais presided over the Annual Convocation of the 167- year old University of Mumbai at the Sir Cowasji Jehangir Convocation Hall of the University. Minister of Higher and Technical Education Chandrakant Patil, Chairman of UGC Prof. M. Jagadesh Kumar, Vice Chancellor of MU Prof. Ravindra Kulkarni, Pro Vice Chancellor Dr. Ajay Bhamare, Registrar Prof. Baliram Gaikwad were present on the dais. Padma awardees from Mumbai, former UP Governor Ram Naik (Padma Bhushan), president of Anjuman E Islam Dr Zahir Kazi (Padmashree) and Rope Mallakhambh coach Uday Deshpande (Padmashri) were present as special invitees.

07 February 2024





# राज्यपालांच्या उपस्थितीत एन. एल. दालमिया संस्थेचा दीक्षांत समारंभ संपन्न

# Governor presides Convocation of Management Institute

महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांच्या अध्यक्षतेखाली एन. एल. दालमिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च संस्थेचा दीक्षांत समारंभ संस्थेच्या मीरा रोड जि. ठाणे येथील शैक्षणिक परिसरात संपन्न झाला. यावेळी राज्यपालांच्या उपस्थितीत पदव्युत्तर व्यवस्थापन पदविकेच्या 2021-2023 तुकडीच्या स्नातकांना पदविका प्रदान करण्यात आल्या. राज्यपालांच्या हस्ते प्रत्येक शाखेतील सर्वोच्च गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना सुवर्णपदके प्रदान करण्यात आली.

१६ डिसेंबर २०२३

Maharashtra Governor and Chancellor of universities Ramesh Bais presided over the Convocation of the N L Dalmia Institute of Management Studies and Research at the Institute's premise at Mira Road, Dist Thane. Post Graduate Diplomas in Management were conferred upon the graduating batch of PGDM 2021-2023.

16 December 2023

SCAN TO WATCH

# राज्यपालांच्या उपस्थितीत संदीप विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ संपन्न
# Governor addresses convocation of Sandeep University







राज्यपाल तथा राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांचे कुलपती रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत नाशिक येथील संदीप विद्यापीठाचा प्रथम दीक्षांत समारंभ संपन्न झाला. दीक्षांत समारोहाला माजी खासदार प्रभात झा, संदीप विद्यापीठाचे कुलपती पंडित नित्यानंद झा, अध्यक्ष डॉ. संदीप झा, कुलगुरू डॉ राजेंद्र सिन्हा, आलोक झा, आर्यन झा, विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.
०५ जानेवारी २०२४

Governor of Maharashtra and Chancellor of public universities in the State Ramesh Bais presided over the first convocation of the Sandeep University in Nashik. Former MP Prabhat Jha, President of the University Nityananda Jha, Chairman Dr. Sandip Jha, Vice Chancellor Dr. Rajendra Singh, faculty, students and parents were present.
05 January 2024

SCAN TO WATCH



# राज्यपालांच्या प्रमुख उपस्थितीत एचएसएनसी समुह विद्यापीठाचा पदवीप्रदान समारंभ

# Governor presides over Convocation of HSNC University

एचएसएनसी समूह विद्यापीठाचा दुसरा वार्षिक दीक्षान्त समारंभ राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यापीठाच्या के.सी.महाविद्यालय सभागृहात संपन्न झाला. कार्यक्रमाला एचएसएनसी समूह विद्यापीठाचे प्रमुख डॉ. निरंजन हिरानंदानी, एचएसएनसी मंडळाचे अध्यक्ष अनिल हरीश, सचिव दिनेश पंजवानी, विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. हेमलता बागला, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. जयेश जोगळेकर, मंडळाचे माजी अध्यक्ष किशु मनसुखानी, कुलसचिव भगवान बालानी, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य, अधिष्ठाता, प्राध्यापक, स्नातक आदी उपस्थित होते.

१२ फेब्रुवारी २०२४

SCAN TO WATCH

Maharashtra Governor and Chancellor of universities Ramesh Bais presided over the Second Annual Convocation of the HSNC Cluster University at the K C College Auditorium, Mumbai. Degrees were awarded to 32 graduating students. Provost of HSNC University Dr Niranjan Hiranandani, President of HSNC Board Anil Harish, Secretary Dinesh Panjwani, former President of the Board Kishu Mansukhani, Vice Chancellor of HSNC University Dr. Hemlata Bagla, Heads of Department, graduating students, teachers and parents were present.

12 February 2024

# राज्यपालांच्या उपस्थितीत श्री बालाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारोह संपन्न

# Governor presides Convocation of Sri Balaji University Pune

राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री बालाजी विद्यापीठ पुणे या विद्यापीठाचा २३ वा दीक्षांत समारोह ताथवडे पुणे येथील विद्यापीठ परिसरात संपन्न झाला. दीक्षांत समारोहाला विद्यापीठाचे कुलपती प्रा. बी. परमानंदन, कुलगुरू प्रा. जी. के. शिरुडे, कुलसचिव डॉ. एस. बी. आगाशे, परीक्षा नियंत्रक डॉ. मित्तल मोहिते, कॉर्पोरेट संपर्क संचालक डॉ. डिम्पल सैनी, अधिष्ठाता डॉ. बिजू पिल्लई तसेच स्नातक व निमंत्रित उपस्थित होते. यावेळी राज्यपालांच्या हस्ते पीएच.डी. तसेच गुणवत्ता प्राप्त स्नातकांना सुवर्ण पदके व प्रमाणपत्रे देण्यात आली.

१६ जानेवारी २०२४

SCAN TO WATCH

Maharashtra Governor Ramesh Bais presided over the 23rd Convocation ceremony of the Sri Balaji University Pune at the University premises at Tathawade Pune. Chancellor of the University Prof. B. Parmanandhan, Vice-Chancellor Prof. G.K. Shirude, Registrar Dr SB Agashe, Controller of Examinations Dr Mittal Mohite, Director Corporate Relations Dr Dimple Saini, Dean and Director Founder Dr Biju Pillai as well as graduates and invitees were present. The Governor conferred Ph.Ds., Gold medals and Certificates of Merit to graduating students.

16 January 2024





# अजिंक्य डी.वाय. पाटील विद्यापीठाचा दीक्षांत समारोह संपन्न

# Governor presides over Convocation of Ajeenkya DY Patil University

पुणे येथील अजिंक्य डी.वाय. पाटील विद्यापीठाचा ८ वा दीक्षांत समारोह राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यापीठ परिसरात संपन्न झाला. यावेळी विधी, डिझाईन, चित्रपट, मीडिया, वास्तुकला, व्यवस्थापन, हॉटेल व्यवस्थापन आदी विद्याशाखांमधील स्नातकांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. दीक्षांत समारोहात शिक्षण तज्ज्ञ भरत अमळकर, सर्वोच्च न्यायालयातील अभियोक्ता जे. साई दीपक, रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ ग्रेट ब्रिटनचे अध्यक्ष रॉबर्ट वॉल्टर, संरक्षण मंत्रालयाचे सल्लागार ले.जन. विनोद खंदारे (नि.) व चित्रपट निर्माते विवेक अग्निहोत्री यांना राज्यपालांच्या हस्ते मानद डिलीट पदवी प्रदान करण्यात आली.

१६ जानेवारी २०२४

Governor Ramesh Bais presided over the 8th Convocation of the Ajeenkya DY Patil University at the University Campus in Lohegaon Pune. Degrees were conferred upon the graduating students from the disciplines of Law, Design, Film, Media, Architecture, Management, Hotel Management etc. Educationist Bharat Amalkar, Supreme Court lawyer J Sai Deepak, President of Restaurant Association of Great Britain Robert Walter, Defence Ministry Advisor Lt. Gen. Vinod Khandare (retd) and filmmaker Vivek Agnihotri were awarded honorary D. Litt. (Honoris Causa) by the Governor.

16 January 2024

**SCAN TO WATCH**





# दीक्षांत समारंभ
# Convocations

## Ahilyadevi Holkar Solapur

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा एकोणिसावा दीक्षांत समारंभ राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांच्या दुरस्थ उपस्थितीत संपन्न झाला.

कार्यक्रमाला सोलापूरचे खासदार डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी, कुलगुरु प्रा. प्रकाश महानवर, प्रकुलगुरु प्रा. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव डॉ योगिनी घारे, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, प्राध्यापक व स्नातक उपस्थित होते.
२१ फेब्रुवारी २०२४

Maharashtra Governor and Chancellor of universities Ramesh Bais presided over the 19th Annual Convocation of the Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University (PAHSU) through online mode.

Emeritus Professor and renowned scientist Padma Vibhushan Prof. M. M. Sharma delivered the Convocation address. 21 February 2024
21 February 2024

## Bharati Vidyapeeth

राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत पुणे भारती विद्यापीठाचा २५ वा वार्षिक दीक्षांत समारोह संस्थेच्या विद्यापीठ परिसरात संपन्न झाला.

यावेळी विद्यापीठाचे कुलपती प्रा. डॉ. शिवाजीराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ. विवेक सावजी, प्र-कुलगुरु डॉ विश्वजित कदम, कुलसचिव जी. जयकुमार, परीक्षा नियंत्रक डॉ. एन्टनी रोज, व्यवस्थापन मंडळ आणि शिक्षण परिषदेचे सदस्य, विविध विभागांचे अधीष्ठाता, प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.
२० मार्च २०२४

Maharashtra Governor Ramesh Bais presided over the 25th Convocation of the Bharati Vidyapeeth at the University's Campus at Dhankawadi in Pune.

Chancellor of the University Prof. Dr. Shivajirao Kadam, Vice Chancellor Dr. Vivek Saoji, Pro Vice Chancellor Dr Vishwajit Kadam, Registrar G. Jayakumar, graduating students and invitees were present.
20 March 2024





# दीक्षांत समारंभ
# Convocations

## Health Sciences

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा २३ वा वार्षिक दीक्षांत समारोह राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती रमेश बैस यांच्या दूरस्थ उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी राज्यपालांच्या हस्ते डिजिटल माध्यमातून विद्यापीठाच्या 'ई - प्रबोधिनी : लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीम' प्रणालीचे उदघाटन करण्यात आले.

दीक्षांत समारोहाला विद्यापीठाचे प्रकुलपती तथा राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, केएलई अकादमी ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च बेळगावचे डॉ नितीन गंगणे, वैद्यकीय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे, विद्यापीठाच्या कुलगुरु ले. जन. (नि.) डॉ माधुरी कानिटकर, प्रकुलगुरु डॉ. मिलिंद निकुम्ब, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, प्राधिकरणाचे सदस्य, अध्यापक व स्नातक उपस्थित होते.
२३ फेब्रुवारी २०२४

Maharashtra Governor and Chancellor of universities Ramesh Bais presided over the 23rd Annual Convocation ceremony of Maharashtra University of Health Sciences (MUHS) through online mode.

The Governor launched 'E- Prabodhini: Learning Management System' through online mode. ENT Specialist Dr Christopher D'Souza was awarded D Litt. for his outstanding contribution in the field of health care.The Governor released the textbook 'Blueprint of Bachelor of Dental Surgery (BDS)' on this occasion.
23 Feb 20224

## North Maharashtra

राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांच्या दुरस्थ उपस्थितीत जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा ३२ वा दीक्षांत समारंभ विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहामध्ये संपन्न झाला. यावेळी असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजच्या सरचिटणीस डॉ. श्रीमती पंकज मित्तल यांनी दीक्षांत भाषण केले.

कुलगुरु प्रो. विजय माहेश्वरी, प्रकुलगुरु सोपान इंगळे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील, कुलसचिव डॉ विनोद पाटील तसेच विविध अधिष्ठाता, प्राध्यापक व स्नातक उपस्थित होते.
२९ फेब्रुवारी २०२४

Maharashtra Governor and Chancellor of universities Ramesh Bais presided over the 32nd Annual Convocation of Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon (KBCNMU) through online mode. Secretary General of Association of Indian Universities (AIU) Dr (Mrs) Pankaj Mittal delivered the Convocation address.
29 February 2024






# दीक्षांत समारंभ
# Convocations

## Sanskrit University

रामटेक येथील कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाचा १२ वा वार्षिक दीक्षांत समारोह राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांच्या दूरस्थ उपस्थितीत संपन्न झाला. दीक्षांत समारोहाला कुमार भास्कर वर्मा संस्कृत व पुरतानाध्यायन विद्यापीठ, नलबारी, आसामचे कुलगुरु प्रो. प्रल्हाद जोशी, विद्यापीठाचे कुलगुरु प्रो. हरे राम त्रिपाठी, कुलसचिव प्रो. कृष्णकुमार पाण्डेय व परीक्षा नियंत्रक डॉ जयवंत चौधरी आदी उपस्थित होते.
०६ मार्च २०२४

Maharashtra Governor and Chancellor of state universities Ramesh Bais presided over the 12th Annual Convocation of the Kavikulaguru Kalidas Sanskrit University Ramtek through online mode.

A total of 10583 degree certificates were conferred on graduating students.
06 March 2024

## Konkan Krishi Vidyapeeth

दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचा ४२ वा दीक्षांत समारोह महाराष्ट्राचे राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांच्या दूरस्थ उपस्थितीत संपन्न झाला.

दीक्षांत समारोहाला भारतीय रसायन तंत्रज्ञान संस्थेचे माजी संचालक पदमभूषण डॉ. ज्येष्ठराज जोशी, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ संजय भावे, विद्यापीठाचे अधिकारी, अधिष्ठाता, विविध प्राधिकरणांचे सदस्य, माजी विद्यार्थी व अध्यापक उपस्थित होते.
१८ मार्च २०२४

Maharashtra Governor and Chancellor of universities Ramesh Bais presided over the 42nd annual convocation of the Dr Balasaheb Sawant Konkan Krishi Vidyapeeth, Dapoli through online mode. Former Director of Institute of Chemical Technology Dr Jyeshtharaj Joshi, Vice Chancellor Dr Sanjay Bhave, officers of the University, Deans, Heads of Department, alumni and graduating students were present.
18 March 2024





# दीक्षांत समारंभ
# Convocations

## Vasantrao Naik Marathwada

राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांच्या दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थितीत परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचा २५ वा दीक्षांत समारोह संपन्न झाला.

यावेळी विद्यापीठ परिसर परभणी येथून कृषी वैज्ञानिक निवड मंडळाचे अध्यक्ष डॉ संजय कुमार, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ इंद्र मणि, माजी कुलगुरु डॉ सी डी मायी, पंकृविचे कुलगुरु डॉ शरद गडाख, माफसूचे कुलगुरु डॉ नितीन पाटील, अधिष्ठाता, विभाग प्रमुख, अध्यापक, माजी विद्यार्थी व स्नातक उपस्थित होते. १९ मार्च २०२४

The 25th Convocation Ceremony of the Vasantrao Naik Marathwada Agricultural University, Parbhani was presided by the Governor of Maharashtra and Chancellor of state universities Ramesh Bais through online mode.

Chairman of Agricultural Scientists Recruitment Board Dr. Sanjay Kumar, former Chairman and former vice chancellor Dr C D Mayee, Vice Chancellor of the University Dr. Indra Mani, Registrar Dr. Purbha Kale, Deans, Head of Department, Faculty, Alumni and Graduating students were present.
19 March 2024

## Animal Sciences Nagpur

राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांच्या दूरस्थ उपस्थितीत महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठाचा (माफसू) ११ वा वार्षिक दीक्षांत समारोह संपन्न झाला. यावेळी १७९० स्नातकांना पदव्या प्रदान करण्यात आल्या, ९५ स्नातकांना सुवर्ण व रौप्य पदके देण्यात आली तर तीन स्नातक विद्यार्थिनींना रोख पारितोषिके देण्यात आली.
१२ फेब्रुवारी २०२४

Maharashtra Governor and Chancellor of universities Ramesh Bais presided over the 11th Annual Convocation of the Maharashtra Animal and Fishery Sciences University (MAFSU) through online mode. Degrees were awarded to 1769 candidates, while gold and silver medals were given to 95 candidates.
12 February 2024





# दीक्षांत समारंभ
# Convocations

## PDKV Akola

राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांच्या दुरस्थ उपस्थितीत अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचा ३८ वा दीक्षांत समारंभ संपन्न संपन्न झाला. दीक्षांत समारोहाला कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दुरस्थ माध्यमातुन संबोधित केले. यावेळी ४०४० स्नातकांना पदव्या प्रदान करण्यात आल्या तर ७९ स्नातकांना सुवर्ण व रौप्य पदके तसेच रोख पारितोषिके देण्यात आली. यावेळी विद्यापीठ परिसरात झालेल्या दीक्षांत समारोहाला नवसारी गुजरात येथील नवसारी कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ झेड पी पटेल, विविध विभागांचे अधिष्ठाता, प्राध्यापक तसेच स्नातक उपस्थित होते.
**१४ फेब्रुवारी २०२४**

Maharashtra Governor and Chancellor of universities Ramesh Bais presided over the 38th Annual Convocation of the Dr Panjabrao Deshmukh Krishi Vidyapeeth (PDKV) Akola through online mode. Gold and Silver medals and Cash prizes were given to 79 meritorious students.
14 Feb 2024

## Sant Gadge Baba Amravati

राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांच्या दुरस्थ उपस्थितीत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा चाळिसावा दीक्षांत समारंभ विद्यापीठ परिसर, अमरावती येथे संपन्न झाला.

दीक्षांत समारोहाला विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष प्रा. दीपक कुमार श्रीवास्तव, विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगांवकर तसेच विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, विद्याशाखांचे अधिष्ठाता, प्राध्यापक तसेच स्नातक विद्यार्थी उपस्थित होते. दीक्षांत समारंभामध्ये ४१,११३ स्नातकांना पदव्या व २४४ विद्यार्थ्यांना पदविका प्रदान करण्यात आल्या.
**२४ फेब्रुवारी २०२४**

Maharashtra Governor and Chancellor of universities Ramesh Bais presided over the 40th Annual Convocation ceremony of Sant Gadge Baba Amravati University, Amravati (SGBAU) through online mode.

Vice Chairman of University Grants Commission Deepak Kumar Shrivastava, Vice Chancellor of SGBAU Dr. Milind Barhate, Pro Vice Chancellor Dr. Prasad Wadegaonkar, Registrar Dr. Tushar Deshmukh, Members of various boards of authorities, Deans, faculty and staff were present.
24 February 2024





# दीक्षांत समारंभ
# Convocations

## Pune Institute

राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांच्या उपस्थितीत पुणे इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट या संस्थेचा १४ वा वार्षिक दीक्षांत समारोह संस्थेच्या सभागृहात संपन्न झाला.

यावेळी पीआयबीएम समूहाचे अध्यक्ष रमण प्रीत, आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मेत्री, वेकफिल्ड फूड्सचे कार्यकारी संचालक डी.एस. सचदेवा, अधिष्ठाता, प्राध्यापक तसेच स्नातक विद्यार्थी उपस्थित होते.
**४ मार्च २०२४**

Maharashtra Governor and Chancellor of Universities Ramesh Bais presided over the 14th Convocation Ceremony of the Pune Institute of Business Management in Pune. Gold Medals were presented to the toppers from various streams on the occasion.

Chairman of PIBM Group Raman Preet, Director of IIM Nagpur Dr. Bhimaraya Metri, CEO and Executive Director of Weikfield Foods D. S. Sachdeva, Deans and Members of Faculty and graduating students were present.
04 March 2024

## Foundation Day of MSSU

राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाचा पहिला वर्धापन दिवस मुंबई येथे साजरा करण्यात आला. यावेळी राज्यपालांच्या हस्ते विद्यापीठाच्या पुढील पाच वर्षांच्या नियोजन अहवालाचे (व्हिजन डाक्युमेंट) प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाला चित्रपट निर्मात्या दिग्दर्शक मेघना गुलजार, कौशल्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओम प्रकाश गुप्ता, वेद मणि तिवारी, विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ अपूर्वा पालकर, कौशल्य आयुक्त निधी चौधरी आदी उपस्थित होते.
**१४ एप्रिल २०२४**

Maharashtra Governor and Chancellor of universities Ramesh Bais presided over the first foundation day celebration of the Maharashtra State Skills University (MSSU) in Mumbai.

The Governor released the Five Year Vision Document of the University on this occasion.
14 April 2024

**SCAN TO WATCH**






# राज्यपालांच्या उपस्थितीत ‘परीक्षा पे चर्चा’

# Governor witnesses PM’s Pariksha Pe Charcha

राज्यपाल रमेश बैस यांनी विविध शाळांमधील शिक्षक, पालक व शालेय विद्यार्थ्यांसह राजभवन येथून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 'परीक्षा पे चर्चा' कार्यक्रम ऐकला तसेच विद्यार्थी, शिक्षक व पालकांशी संवाद साधला. यावेळी अंजुमन इस्लाम संस्थेच्या सैफ तैयबजी गर्ल्स स्कूल, गोपी बिर्ला मेमोरियल स्कूल व जी डी सोमाणी स्कूलचे विद्यार्थी, शिक्षक व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाला शालेय शिक्षण विभाग व बृहन्मुंबई महानगर पालिका यांचे सहकार्य लाभले.

२९ जानेवारी २०२४

Maharashtra Governor Ramesh Bais witnessed the live interaction by Prime Minister Narendra Modi with students - 'Pariksha Pe Charcha' and also spoke to the school students assembled at Raj Bhavan Mumbai. Students, parents and teachers of Anjuman I Islam's Saif Tyabji Girls High School, Gopi Birla Memorial School and G D Somani Schools were present.

29 January 2024



# शैक्षणिक सहकार्य
# Academic collaboration

अमेरिकेतील मिसौरी येथील २०५ वर्षे जुन्या सेंट लुईस विद्यापीठाचे सहयोगी प्रोव्होस्ट डॉ. एरिक ऍम्ब्रेख्त यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठाच्या एका शिष्टमंडळाने महाराष्ट्राचे राज्यपाल तसेच कुलपती रमेश बैस यांची राजभवन, मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली. मुंबई विद्यापीठासह महाराष्ट्रातील इतर विद्यापीठांसोबत कौशल्य शिक्षणासह विविध विषयांवर सहकार्याची क्षेत्रे ठरविण्यासाठी सेंट लुईस विद्यापीठाचे शिष्टमंडळ भारत भेटीवर आले आहे. यावेळी सेंट लुईस विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय सहकार्य विभागाचे उपाध्यक्ष लूशेन ली, सल्लागार सुंदर कुमारसामी व जागतिक उपक्रम विभागाच्या सहसंचालिका अनुशिका जैन उपस्थित होत्या.
११ जुलै २०२३

A high level academic delegation from the 205 - year old Saint Louis University, Missouri, USA led by Associate Provost Eric Armbrecht met Maharashtra Governor Ramesh Bais at Raj Bhavan, Mumbai. The delegation was in India to discuss collaboration opportunities with the University of Mumbai and other universities in Maharashtra. Associate Vice President of Global Engagement Dr. Luchain Lee, Advisor Sundar Kumarswami and Director of Global Initiatives Anushika Jain were among those present.
11 July 2023



# राज्यपालांचे कार्यक्रम

# Events and Programmes



# राज्यपालांची युद्धनौकेला भेट; पाणबुडीची पाहणी
# Governor visits Warship; inspects Submarine

राज्यपाल रमेश बैस यांनी भारतीय नौसेनेच्या आयएनएस विशाखापटनम या युद्धनौकेला तसेच आयएनएस वेला या स्कॉर्पियन पाणबुडीला भेट देऊन पाहणी केली. नौसेनेच्या पश्चिम मुख्यालयाचे चीफ ऑफ स्टाफ व्हाईस ॲडमिरल संजय भल्ला व आयएनएस विशाखापटनमचे कमान अधिकारी कॅप्टन अशोक राव यांनी राज्यपालांचे स्वागत केले व त्यांना युद्धनौकेची माहिती दिली. आयएनएस वेलाचे कमोडोर श्रीराम अमूर व कमान अधिकारी मिथिलेश उपाध्याय यांनी राज्यपालांना आयएनएस वेला पाणबुडीची माहिती दिली.

१७ जुलै २०२३

Maharashtra Governor Ramesh Bais inspected the warship INS Visakhapatnam and Scorpion Submarine INS Vela in Mumbai. Chief of Staff, Western Naval Command Vice Admiral Sanjay Bhalla, NM and Commanding Officer Capt Ashok Rao apprised the Governor about the Warship. The visit to the Submarine INS Vela was conducted by Commodore Sriram Amur and Commanding Officer Mithilesh Upadhyay.

17 July 2023







# राज्यपालांच्या उपस्थितीत बिटिंग रिट्रीट समारोह
# Governor attends Beating Retreat

राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय नौदलाच्या पश्चिम विभाग मुख्यालयातर्फे गेट वे ऑफ इंडिया येथे 'बिटींग रिट्रीट' आणि 'टॅटू सेरेमनी' समारोहाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला नौदलाच्या पश्चिम कमानचे मुख्य ध्वज अधिकारी व्हाईस ॲडमिरल दिनेश कुमार त्रिपाठी, नौदलाचे वरिष्ठ अधिकारी, माजी अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील निमंत्रित उपस्थित होते. यावेळी नौदलातर्फे हेलिकॉप्टर्सचे फ्लाय पास्ट, नेव्हल सेंट्रल बँड, कुठल्याही मौखिक आदेशाशिवाय सातत्यपूर्ण कवायत आणि सी कॅडेट कोअरच्या लहान मुलींतर्फे 'हॉर्नपाइप सेलर्स डान्स' सादर करण्यात आले.
**१४ डिसेंबर २०२३**

Governor Ramesh Bais attended the 'Beating Retreat' and Tattoo Ceremony organised by the Western Naval Command of Indian Navy at Gateway of India in Mumbai on the occasion of Navy Day. Vice Admiral Dinesh Kumar Tripathi, Flag Officer Commanding in Chief, Western Naval Command, serving and retired officers of Indian Navy and invitees from various walks of life were present.
14 December 2023

SCAN TO WATCH





# नंदुरबार येथे ‘जनजातीय गौरव दिवस’ साजरा

# ‘Janajati Gaurav Diwas’ celebrated at Nandurbar

राज्यपाल रमेश बैस व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत नंदुरबार येथे 'जनजातीय गौरव दिवस' साजरा करण्यात आला. यावेळी राज्यपालांच्या हस्ते राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाचे ऑनलाईन पद्धतीने उदघाटन करण्यात आले. नंदुरबार येथे आगमनप्रसंगी राज्यपालांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाला राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ विजय कुमार गावित, नंदुरबारचे पालकमंत्री अनिल भाईदास पाटील, खासदार डॉ हिना गावित, नंदुरबार जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष डॉ सुप्रिया गावित, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, नाशिकचे विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे आदी उपस्थित होते.

१५ नोव्हेंबर २०२३

The third 'Janajati Gaurav Diwas' was celebrated at Nandurbar in the presence of Maharashtra Governor Ramesh Bais and Chief Minister Eknath Shinde. The Governor inaugurated the State Level Tribal Cultural Festival through online mode. Earlier the Governor was welcomed on his arrival in Nandurbar. Minister of Tribal Development Dr Vijay Kumar Gavit, Guardian Minister of Nandurbar Anil Bhaidas Patil, Member of Parliament Dr Heena Gavit, President of Zilla Parishad Nandurbar Dr Supriya Gavit, Secretary, Tribal Welfare Vijay Waghmare, Divisional Commissioner of Nashik Radhakrishna Game were among those present.

15 November 2023

**SCAN TO WATCH**






# मार ग्रेगोरियस ऑर्थोडॉक्स चर्चची सुवर्ण जयंती

# Governor attends Golden Jubilee of Orthodox Church

भारतातील सर्वात जुने चर्च असलेल्या इंडियन ऑर्थोडॉक्स चर्चच्या चेंबूर मुंबई येथील 'मार ग्रेगरियस ऑर्थोडॉक्स सीरियन चर्च'चा सुवर्ण महोत्सव राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत व्ही एन पूर्व मार्ग चेंबूर येथे संपन्न झाला. यावेळी राज्यपालांच्या हस्ते सुवर्ण महोत्सवी स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी ऑर्थोडॉक्स चर्चचे सर्वोच्च धर्मगुरु बॅसिलियस मार्थोमा मॅथ्यूज तृतीय, मुंबईचे मुख्य बिशप गीवर्गीस मार कुरीलोस, केरळच्या अंगमॅली धर्मप्रांताचे बिशप डॉ यूहानॉन मार पॉलिकार्पोस, अहमदाबाद धर्मप्रांताचे बिशप गीवर्गीस मार थिओफिलोस, चेंबूरच्या ग्रेगोरियस चर्चचे मुख्य धर्मगुरु फादर जॉय स्कारिया, पी जे चांडी, फिलिप मम्मेन तसेच निमंत्रित उपस्थित होते.

**२५ नोव्हेंबर २०२३**

The Golden Jubilee of 'Mar Gregorios Orthodox Syrian Church' was commemorated in presence of Maharashtra Governor Ramesh Bais at the Church's premises in at Chembur Mumbai. The Governor released the Golden Jubilee Souvenir on the occasion. Supreme Leader of the Orthodox Church, Catholicos of the East and Malankara Metropolitan Basilius Marthoma Mathews III, Metropolitan of Mumbai Diocese Geevarghese Mar Coorilos, Metropolitan of Angamaly Diocese Dr. Yohanon Mar Policarpos, Metropolitan of Ahmedabad Diocese Dr Geevarghese Mar Theophilos, Vicar of the Gregorios Church Father Joy Skaria, PJ Chandy, Philip Mammen, and other invitees were present.

25 November 2023

**SCAN TO WATCH**







# राज्यपालांची पुण्यातील 'बाल कल्याण' संस्थेला भेट

# Governor visits 'Bal Kalyan' Sanstha in Pune

राज्यपाल रमेश बैस यांनी पुण्यातील 'बाल कल्याण' संस्थेला भेट देऊन तेथील उपक्रमांची माहिती घेतली.

'बाल कल्याण' संस्थेने दिव्यांग मुलांच्या विकासासाठी योगदान देत हजारो लोकांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य केले आहे. अशा संस्थांच्या विकासात समाजाने कर्तव्यभावनेने सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी राज्यपालांनी केल.

यावेळी राज्यपालांच्या पत्नी व संस्थेच्या अध्यक्षा रामबाई बैस, संस्थेचे मानद सचिव प्रतापराव पवार, पोलीस आयुक्त रितेश कुमार, विभागीय उपायुक्त वर्षा लड्डा उंटवाल, संस्थेचे विश्वस्त, व्यवस्थापिका अपर्णा पानसे आदी उपस्थित होते.
१६ ऑगस्ट २०२३

Governor Ramesh Bais visited the 'Baal Kalyan' Sanstha in Pune and interacted with Divyang children.

Spouse of the Governor and President of the Sanstha Smt Rambai Bais, Honorary Secretary Prataprao Pawar, Commissioner of Police Ritesh Kumar, Dy. Div. Commissioner Varsha Ladda Untwal, Trustees of the Institute, Manager Aparna Panse and others were present.
16 August 2023

SCAN TO WATCH





# राज्यपालांची क्रांतिवीर चापेकर बंधू वाड्याला भेट

# Governor visits Kranti Veer Chapekar Bandhoo Smarak

राज्यपाल रमेश बैस यांनी चिंचवड पुणे येथील क्रांतिवीर चापेकर बंधू यांच्या ‘क्रांतितीर्थ’ वाड्याला भेट देऊन ऐतिहासिक वस्तू, छायाचित्रे आदींची पाहणी केली. राज्यपालांच्या उपस्थितीत क्रांतिवीर चापेकर बंधू स्मारक समितीच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या 'पुनरुत्थान गुरुकुलम्'च्या सुवर्ण महोत्सवी सांगता झाली. कार्यक्रमाला आमदार उमा खापरे, महेश लांडगे, अश्विनी जगताप, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, संस्थेचे अध्यक्ष पद्मश्री गिरीश प्रभुणे, कार्यवाह मिलिंद देशपांडे, सचिव सतीश गोरडे उपस्थित होते.

१२ सप्टेंबर २०२३

Maharashtra Governor Ramesh Bais visited the Kranti Veer Chapekar Bandhoo Smarak and attended the Golden Jubilee of its project Punarutthan Samarasata Gurukulam at Chinchwad near Pune. Chairman of the Gurukulam Padma Shri Girish Prabhune, MLA Uma Khapre, Mahesh Landge, Ashwini Jagtap, Commissioner of Pimpri Chinchwad Shekhar Singh, Milind Deshpande, Secretary Satish Gorde and others were present.

12 September 2023

SCAN TO WATCH





# राज्यपालांच्या उपस्थितीत ‘पर्युषण महापर्व’ संपन्न

# Governor attends Paryushan Mahaparva

राज्यपाल रमेश बैस यांनी श्रीमद राजचंद्र मिशन धरमपूर या संस्थेतर्फे आयोजित 'पर्युषण महापर्व - २०२३' कार्यक्रमाला उपस्थित राहून सत्संग श्रवण केले तसेच उपस्थितांना संबोधित केले. यावेळी मिशनचे अध्यात्मिक प्रमुख गुरुदेवश्री राकेश जी यांनी पर्युषण निमित्त प्रवचन केले. गुरुदेवश्री राकेशजी यांच्या हस्ते राज्यपालांना झारखंड येथील पवित्र जैन तीर्थस्थळ श्री सम्मेत शिखरजी पर्यटन स्थळ होण्यापासून वाचविल्याबद्दल 'जैन धर्म हितेशी' उपाधी प्रदान करण्यात आली. यावेळी राज्यपालांच्या हस्ते 'डिलिंग विथ एंगर इफेक्टिव्हली' व 'रिलीजींग एंगर मेडिटेशन' या क्रोध नियंत्रण या विषयावरील पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

**१४ सप्टेंबर २०२३**

Maharashtra Governor Ramesh Bais attended the discourse by Pujya Gurudevshri Rakeshji, Spiritual head of Shrimad Rajchandra Mission Dharampur in Mumbai on the occasion of 'Paryushan Mahaparva'. Governor Ramesh Bais was conferred the title of 'Jain Dharma Hiteshi' at the pious hands of Pujya Gurudevshri, for his role in protecting the Jain Tirth of Shri Samet Shikharji from becoming a tourist spot.

14 September 2023

**SCAN TO WATCH**





# राज्यपालांच्या हस्ते शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान

# Governor presents Shiv Chhatrapati State Sports Awards

महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते सन २०१९- २० व २०२० -२१ तसेच २०२१- २२ या वर्षांचे शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांचे वितरण बालेवाडी, पुणे येथील शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे समारंभपूर्वक करण्यात आले. यावेळी ११८ क्रीडापटू, दिव्यांग क्रीडापटू व क्रीडा प्रशिक्षक यांना स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. पुरस्कार सोहळ्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री गिरीश महाजन, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे तसेच वरिष्ठ प्रशासकिय अधिकारी, कर्मचारी व क्रीडाप्रेमी यावेळी उपस्थित होते.

२८ ऑगस्ट २०२३

The Shiv Chhatrapati State Sports Awards for the years 2019-20, 2020-21 and 2021-22 were distributed at the hands of State Governor Ramesh Bais at Shiv Chhatrapati Sports Complex in Balewadi, Pune. In all 118 sportspersons, Divyang sportspersons and sports coaches were honored on the occasion. Chief Minister Eknath Shinde, Deputy Chief Minister Devendra Fadnavis, Deputy Chief Minister Ajit Pawar, Minister of Cooperation Dilip Valse Patil, Minister of Higher and Technical Education Chandrakant Patil, Minister of Rural Development Girish Mahajan, Minister of Sports and Youth Welfare Sanjay Bansode and senior government officers and sports lovers were present.

28 August 2023

**SCAN TO WATCH**





# राज्यपालांच्या उपस्थितीत अंजुमन इस्लामचा १५० वा वर्धापन दिन

# Governor launches 150th Anniversary of Anjuman I Islam

सन १८७४ साली स्थापन झालेल्या मुंबईतील अंजुमन- ई - इस्लाम शैक्षणिक संस्थेच्या स्थापनेच्या १५० व्या वर्षाचा उदघाटन सोहळा राज्यपाल रमेश बैस यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी अंजुमन समुहातील विविध संस्थांमध्ये अध्यापन करीत असताना पीएचडी प्राप्त करणाऱ्या ५७ शिक्षकांचा तसेच विद्यार्थ्यांचा राज्यपालांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अंजुमन संस्थेच्या मुंबई सेन्ट्रल येथील सैफ तय्यबजी मुलींच्या शाळेच्या सभागृहात झालेल्या सत्कार सोहळ्याला 'अंजुमन'चे अध्यक्ष डॉ झहीर काझी, वरिष्ठ उपाध्यक्ष मुश्ताक अंतुले, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ रविंद्र कुलकर्णी तसेच संस्थेचे विश्वस्त प्राचार्य, शिक्षक व माजी विद्यार्थी उपस्थित होते.

२७ जुलै २०२३

The yearlong celebrations of the 150th anniversary of Anjuman I Islam institution was launched in presence of Maharashtra Governor Ramesh Bais in Mumbai. The Governor felicitated 57 faculty members and students of various educational institutions of Anjuman-I-Islam who obtained Ph. D. degrees. The felicitation programme was held at Anjuman's Saif Tyabji Girls High School, Mumbai Central. President of Anjuman-I-Islam Dr. Zahir Kazi, Vice Chancellor of University of Mumbai Dr. Ravindra Kulkarni, Senior Vice President of 'Anjuman' Mushtaq Antulay, Principals, teachers and alumni of various Anjuman institutions were present.

27 July 2023

**SCAN TO WATCH**





# स्काऊट गाईड संघटनेचे आश्रयदाते म्हणून राज्यपालांचे पदग्रहण
# Governor sworn in as patron of Scouts and Guides

राज्यपाल रमेश बैस यांचे महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट आणि गाईड संघटनेचे मुख्य आश्रयदाते म्हणून पदग्रहण झाले. यावेळी क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री तसेच स्काऊट्सचे राज्य अध्यक्ष संजय बनसोडे यांच्या हस्ते राज्यपालांना स्काऊट स्कार्फ तसेच मानचिन्ह प्रदान करण्यात आले. राजभवन येथे झालेल्या पदग्रहण सोहळ्यात स्काऊट गाईडचे मुख्य आयुक्त डॉ सुहास दिवसे यांनी राज्यपालांना स्काऊट प्रतिज्ञा दिली. महाराष्ट्र स्काऊटच्या राज्य चिटणीस सारिका बांगडकर यांनी आभार प्रदर्शन केले.

२६ सप्टेंबर २०२३

Maharashtra Governor Ramesh Bais was formally sworn in as the Patron of the Maharashtra State Bharat Scouts and Guides at an Installation ceremony held at Raj Bhavan, Mumbai. State President of Maharashtra State Bharat Scouts and Guides and Minister of Sports and Youth Welfare Sanjay Bansode presented the Insignia and Scarf of the Scouts to the Governor. State Chief Commissioner of Maharashtra Dr Suhas Diwase gave the Scouts pledge to the Governor, while State Secretary Sarika Bangadkar delivered the vote of thanks.

26 September 2023

**SCAN TO WATCH**






# Visits to Temples

## Lalbaug-cha Raja

महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांनी मुंबईतील प्रसिद्ध सार्वजनिक गणेशोत्सव ‘लालबागच्या राजा’चे दर्शन घेतले. यावेळी मंडळाचे पदाधिकारी सुधीर साळवी यांनी राज्यपालांचे स्वागत केले.
२६ सप्टेंबर २०२३

Maharashtra Governor Ramesh Bais visited Mumbai’s famous Sarvajanik Ganeshotsav ‘Lalbaug-cha Raja’ during the ongoing Ganesh festival in Mumbai. Office bearer of the Mandal Sudhir Salvi welcomed the Governor.
26 September 2023

SCAN TO WATCH

## Durga Puja

दुर्गाष्टमी निमित्त राज्यपाल रमेश बैस यांनी खार मुंबई येथील रामकृष्ण मठ व मिशनतर्फे आयोजित दुर्गा पूजा उत्सवाला भेट देऊन 'संधी पूजा' केली. यावेळी राज्यपालांनी रामकृष्ण परमहंस यांच्या तसेच शारदा माता यांच्या मंदिरात जाऊन त्यांच्या प्रतिमांचे दर्शन घेतले. मुंबई येथील रामकृष्ण मठ व मिशन यंदा स्थापनेचे शताब्दी वर्ष साजरे करीत आहे.
२२ ऑक्टोबर २०२३

Maharashtra Governor Ramesh Bais visited the Durga Puja organised by the Ramakrishna Math and Mission in Mumbai. The Governor performed the Sandhi Puja on the occasion. The Mumbai Ramakrishna Math and Mission is celebrating the Centenary Year of its establishment this year.
22 October 2023





# Programmes

## ‘Aispais Gappa Neelam Tainshi’

राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थित विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोर्हे यांच्या जीवन व कार्यावर आधारित 'ऐस पैस गप्पा नीलमताईंशी' या आत्मचरित्रपर पुस्तकाचे राजभवन मुंबई प्रकाशन करण्यात आले. प्रकाशन सोहळयाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, डॉ. नीलम गोर्हे, लोकप्रतिनिधी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, लेखिका करुणा गोखले व इतर निमंत्रित उपस्थित होते.
**१३ सप्टेंबर २०२३**

Governor Ramesh Bais released the autobiographical book 'Aispais Gappa Neelam Tainshi' on deputy chairperson of Maharashtra Legislative Council Dr Neelam Gorhe at Raj Bhavan Mumbai.
13 September 2023

**SCAN TO WATCH**

## Centenary of Dev Anand

प्रसिद्ध अभिनेते देव आनंद यांच्या १०० व्या जयंती निमित्त त्यांच्यावरील ‘के दिल अभी भरा नहीं’ या कॉफी टेबल पुस्तकाचे प्रकाशन राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते मुंबई येथील वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे झाले. ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज व वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबई यांच्या पुढाकाराने हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले.

प्रकाशन सोहळयाला वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबईचे अध्यक्ष विजय कलंत्री, उपाध्यक्ष अजय रुईया, कझाकस्थानचे मानद वाणिज्यदूत महेंद्र सांघी, कोरस इंडियाचे अध्यक्ष आनंद थिरानी, वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या कार्यकारी संचालिका रूपा नाईक, भजन सम्राट अनुप जलोटा यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.
**१७ नोव्हेंबर २०२३**

Governor Ramesh Bais released the Coffee Table Book on legendary film star Dev Anand titled 'Ke Dil Abhi Bhara Nahin' at World Trade Centre in Mumbai. The book has been brought out by the World Trade Centre Mumbai and All India Association of Industries to commemorate the 100th Birth Anniversary of Dev Anand.
17 November 2023

**SCAN TO WATCH**







# राज्यपालांचे पोलीस हुतात्म्यांना अभिवादन

# Governor pays tribute to martyrs on 26/11 anniversary

राज्यपाल रमेश बैस यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेसह मुंबई पोलीस आयुक्त कार्यालय परिसरातील पोलीस हुतात्मा स्मारक येथे हौतात्म्य प्राप्त झालेल्या पोलीस अधिकारी व जवानांना पुष्पचक्र वाहून आपली श्रद्धांजली वाहिली. हुतात्म्यांना पुष्पचक्र वाहिल्यानंतर राज्यपालांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्यासह हुतात्मा पोलीस कुटुंबातील सदस्यांची भेट घेतली.

**२६ नोव्हेंबर २०२३**

Maharashtra Governor Ramesh Bais accompanied by CM Eknath Shinde and Dy CM Devendra Fadnavis placed wreaths at the Police Martyrs' Memorial in the premises of the Mumbai Police Commissionerate on the occasion of the 15th anniversary of the martyrdom of police officers and jawans during the Mumbai terrorist attack. The Governor, Chief Minister and the Deputy Chief Minister later met the family members of the police martyrs present on the occasion.

26 November 2023





# शालेय शिक्षण विभागाच्या विविध उपक्रमांचा शुभारंभ

# Governor, CM launch various School Education initiatives

राज्यपाल बैस व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शालेय शिक्षण विभागाच्या सहा प्रोत्साहनात्मक योजनांचा राजभवन येथे शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाला शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री गिरीश महाजन, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजीत सिंह देओल, आयुक्त सुरज मांढरे आदी उपस्थित होते.

०५ डिसेंबर २०२३

**SCAN TO WATCH**

Maharashtra Governor Ramesh Bais launched various initiatives and incentive schemes of the School Education Department at Raj Bhavan Mumbai. Schemes such as 'Chief Minister My School, A Beautiful School', 'Goshtincha Shanivar', 'Enjoyable Reading', 'Cleanliness Monitor' etc. were launched on the occasion. Initiatives like Adopt Schools, Mahavachan Utsav, 'My School My Yard', were also launched. Chief Minister Eknath Shinde, School Education Minister Deepak Kesarkar, Minister of Rural Development Girish Mahajan, Minister of Skill Development Mangal Prabhat Lodha, Principal Secretary School Education Ranjit Singh Deol, Commissioner Suraj Mandhre and others were present.

05 December 2023











# मुलांची झोप पुरेशी व्हावी या दृष्टीने शाळांच्या वेळा बदलण्याबाबत विचार व्हावा - राज्यपाल रमेश बैस

अलीकडच्या काळात सर्वांच्याच झोपेच्या वेळा बदलल्या आहेत. मध्यरात्रीनंतरही मुले जागी राहतात. परंतु शाळांसाठी त्यांना लवकर उठावे लागते व त्यामुळे त्यांची झोप पूर्ण होत नाही. मुलांची झोप चांगली व्हावी या दृष्टीने शाळांच्या वेळा बदलण्याबाबत विचार व्हावा अशी सूचना राज्यपाल रमेश बैस यांनी येथे केली. मुलांच्या दप्तराचा भार हलका करण्यासाठी 'पुस्तक - विहीन' शाळा, ई - वर्ग यांना चालना द्यावी तसेच शाळांचे गुणवत्तेनुसार श्रेणीकरण करावे अशाही सूचना राज्यपालांनी केल्या.

राज्यपाल बैस व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी (दि. ५) शालेय शिक्षण विभागाच्या सहा प्रोत्साहनात्मक योजनांचा राजभवन येथे शुभारंभ करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा', 'गोष्टींचा शनिवार', 'आनंददायी वाचन', 'दत्तक शाळा उपक्रम', 'माझी शाळा माझी परसबाग', 'स्वच्छता मॉनिटर - २' व मुंबई महानगर पालिकेच्या नवीन शालेय इमारतींचे लोकार्पण आदी योजनांचा शुभारंभ करण्यात आला.

कार्यक्रमाला शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री गिरीश महाजन, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजीत सिंह देओल, आयुक्त सुरज मांढरे आदी उपस्थित होते.

राज्यात शेकडो सार्वजनिक ग्रंथालये आहेत. मात्र आज ग्रंथालये ओस पडली आहेत. अधिकतर पुस्तके जुनी किंवा कालबाह्य झाली आहेत. सर्व वाचनालयांना इंटरनेट, कॉम्पुटर सुविधा देऊन नवसंजीवनी देणे आवश्यक आहे. यासाठी ग्रंथालय दत्तक योजना देखील चालू केली पाहिजे व ग्रंथालयांचा कायापालट केला पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले.

आजकाल विद्यार्थी केवळ पुस्तकांच्या माध्यमातून ज्ञान ग्रहण करीत नसून ते इंटरनेट, समाज माध्यमे यांसह विभिन्न स्रोतांमधून ज्ञान मिळवत आहेत. मुलांचा बुद्ध्यांक वाढत असून शिक्षकांनी अध्ययनाच्या बाबतीत अद्ययावत राहिले पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले.

इंटरनेटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या हाती केवळ सुरक्षित सामग्री पोहोचावी या दृष्टीने पालक व शिक्षकांनी जागरूक राहिले पाहिजे. सायबर गुन्ह्यांपासून मुलांचे रक्षण व्हावे यासाठी शाळांमध्ये व्याख्याने व सत्रांचे आयोजन केले जावे अशीही सूचना राज्यपालांनी केली.

शिक्षण विद्यार्थ्यांसाठी आनंददायी व्हावे व्हावे या दृष्टीने शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गृहपाठ कमी द्यावा तसेच खेळ व इतर कृतिशील उपक्रमांवर भर द्यावा असे राज्यपालांनी सांगितले. **०५ डिसेंबर २०२३**

# सदिच्छा भेट
# Courtesy Call

## Probationary IAS officers of 2022 Batch




भारतीय प्रशासकीय सेवेच्या २०२२ च्या तुकडीतील १४ परिविक्षाधीन अधिकाऱ्यांनी राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन, मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली. २२ नोव्हेंबर २०२३

## Induction Training of  77th batch at NADT



राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी नागपूर येथे सुरु होत असलेल्या भारतीय राजस्व सेवेच्या ७७ व्या तुकडीच्या ९० अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा आरंभ राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत एनएडीटीच्या सभागृहात झाला.  १६ नोव्हेंबर २०२३

# Programmes

## Probationary IPS officers of 2022 Batch

भारतीय पोलीस सेवेच्या २०२२ तुकडीतील महाराष्ट्र कॅडरच्या ८ परिविक्षाधीन अधिकाऱ्यांनी राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन, मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी विशेष पोलीस महानिरिक्षक प्रशिक्षण व खास पथके संजय दराडे हे देखील उपस्थित होते. ०५ डिसेंबर २०२३

A group of 8 Probationary Officers of Indian Police Services of 2022 batch belonging to Maharashtra Cadre called on Maharashtra Governor Ramesh Bais at Raj Bhavan, Mumbai. Special Police Inspector General (Training and Special Squads) Sanjay Darade was also present.
05 December 2023

## Police Raising Day

राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत गोरेगाव मुंबई येथील राज्य राखीव पोलीस दलाच्या मैदानावर महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन साजरा करण्यात आला. राज्यपालांनी वर्धापन दिन संचलनाचे निरीक्षण केले व शिस्तबद्ध संचलनाकडून मानवंदना स्वीकारली. संचलनामध्ये मुंबई पोलीस, राज्य राखीव पोलीस दलाची तुकडी, निशाण टोळी, महिला पोलीस व बँड पथक सहभागी झाले होते. यावेळी राज्याच्या पोलीस महासंचालक (अतिरिक्त कार्यभार) विवेक फणसाळकर, तसेच वरीष्ठ पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच त्यांचे कुटूंबीय उपस्थित होते.
०२ जानेवारी २०२४

Governor Ramesh Bais attended the Maharashtra Police Raising Day function organised by Maharashtra Police at the State Reserve Police Force Ground at Goregaon Mumbai. Director General of Police (In Charge) Vivek Phansalkar, senior police officers, retired police officers, police jawans and their family members were present.
02 January 2024






# Tributes : Bharat Ratna Dr Babasaheb Ambedkar

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चैत्यभूमी स्मारक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. मंत्री दीपक केसरकर, मंगल प्रभात लोढा व संजय बनसोडे, खासदार राहुल शेवाळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू भीमराव आंबेडकर, यांनी देखील डॉ आंबेडकर यांना अभिवादन केले.

**०६ डिसेंबर २०२३**

Governor Ramesh Bais accompanied by Chief Minister Eknath Shinde and Dy CMs Devendra Fadnavis and Ajit Pawar offered floral tributes to Bharat Ratna Dr Babasaheb Ambedkar at Chaityabhumi on the occasion of the 67th Mahaparinirvan Din.

06 December 2023

**SCAN TO WATCH**



# भारत-२०४७ राष्ट्रीय संमेलन संपन्न

# India@2047 : Role of Higher Education

राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांच्या अध्यक्षतेखाली ‘भारताला विकसित राष्ट्र बनविण्यात उच्च शिक्षणाची भूमिका - भारत@२०४७’ या विषयावर आयोजित राष्ट्रीय संमेलन संपन्न झाले. कार्यक्रमाला आयोजक संस्था, ‘एज्युकेशन प्रमोशन सोसायटी ऑफ इंडिया’चे संस्थापक डॉ.जी.विश्वनाथन, अध्यक्ष डॉ. एम.आर.जयरामन, प्रा.मंगेश कराड, डॉ. प्रशांत भल्ला, डॉ. एच.चतुर्वेदी आदी उपस्थित होते.

**४ मार्च २०२४**

Maharashtra Governor Ramesh Bais presided over the National Conference on 'India@2047: Role of Higher Education in Making India a Developed Nation' in Pune. The Conference was organized by the Education Promotion Society for India (EPSI).

**4 March 2024**

**SCAN TO WATCH**



# राज्यपालांच्या हस्ते मुंबई मॅरेथॉनला झेंडी
# Governor flags off Mumbai Marathon

राज्यपाल रमेश बैस यांनी मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनससमोरून टाटा मुंबई 'मॅरेथॉन एलिट' स्पर्धेला झेंडा दाखवून रवाना केले. यावेळी राज्यपालांनी 'चॅम्पियन्स विथ डिसॅबिलिटीज' - दिव्यांग व्यक्तींची स्पर्धा तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या स्पर्धेला देखील झेंडा दाखवून रवाना केले.
गीतकार गुलजार यांनी यंदा ज्येष्ठ नागरिकांच्या स्पर्धेत भाग घेतला. राज्याचे मंत्री छगन भुजबळ आणि दीपक केसरकर यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजक अनिल सिंह व विवेक सिंह आणि गणमान्य नागरिक उपस्थित होते. यंदाच्या मॅरेथॉनमध्ये ६० हजार लोक सहभागी होत असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

२१ जानेवारी २०२४

Maharashtra Governor Ramesh Bais today flagged off the Tata Mumbai Marathon Elite Race from opposite the Chhatrapati Shivaji Maharaj Terminus in Mumbai. The Governor also flagged off the Champions with Disabilities Race, a race for the Divyang persons, and the Senior Citizens' Run on the occasion. Lyricist Gulzar participated in the senior citizen's run on the occasion. Maharashtra's Ministers Chhagan Bhujbal and Deepak Kesarkar were present. Legislator Ashish Shelar, Flag Officer Commanding in Chief Western Naval Command Vice Admiral Sanjay Singh, GOC in C, Maharashtra, Gujarat and Goa area Maj Gen H S Kahlon, Municipal Commissioner I S Chahal, organisers of the event Vivek Singh and officials were present. According to the organizers, 60000 persons are participating in this year's Marathon.

21 January 2024

**SCAN TO WATCH**





# प्रजासत्ताक दिनानिमित्त राज्यपालांची राष्ट्रध्वजाला मानवंदना
# Governor unfurls national flag on Republic Day

देशाच्या ७५ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राज्यपाल रमेश बैस यांनी शिवाजी पार्क मुंबई येथे झालेल्या मुख्य शासकीय सोहळयात राष्ट्रीय ध्वज फडकवून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. यावेळी राज्यपालांनी प्रजासत्ताक दिन संचलनाचे निरीक्षण केले व विविध पथकांकडून मानवंदना स्वीकारली. राज्यपालांनी यावेळी राज्यातील जनतेला उद्देशून संबोधित केले. शासकीय सोहळ्याला राज्यपालांच्या पत्नी रामबाई बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, संयुक्त राष्ट्र महासभेचे अध्यक्ष डेनिस फ्रान्सिस, मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव नितिन करीर, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, विविध देशांचे मुंबईतील वाणिज्यदूत, सैन्य दले, प्रशासन तसेच पोलीस दलातील वरिष्ठ शासकीय अधिकारी तसेच निमंत्रित मान्यवर उपस्थित होते.
२६ जानेवारी २०२४

SCAN TO WATCH

The Governor of Maharashtra Ramesh Bais unfurled the National Flag and delivered his Republic Day Message to the people on the occasion of the 75th Republic Day at the State function held at Shivaji Park in Mumbai. The Governor inspected the ceremonial parade and read out his Republic Day Message. Spose of the Governor, Smt Rambai Bais, Chief Minister Eknath Shinde, President of United Nations General Assembly Dennis Francis, Minister of Skills Mangal Prabhat Lodha, Diplomats from various countries, Chief Secretary Nitin Kareer, DGP Rashmi Shukla, senior government officers of the Armed Forces, Administration and Police were present. 26 January 2024






## Vishwa Marathi Sammelan

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व मराठी भाषा विभागातर्फे आयोजित दुसऱ्या विश्व मराठी संमेलनाचे उदघाटन राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत सिडको प्रदर्शन केंद्र नवी मुंबई येथे संपन्न झाले. टाळ चिपळयांच्या गजरात राज्यपालांचे स्वागत करण्यात आले. राज्यपालांच्या हस्ते 'निवडक रवींद्र शोभणे' या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.
२७ जानेवारी २०२४

Maharashtra Governor Ramesh Bais inaugurated the World Marathi Conference - Vishwa Marathi Sammelan 2024 - organized by the Department of School Education and Marathi Language, Government of Maharashtra at CIDCO Exhibition Center Navi Mumbai. The Governor released the book 'Nivdak Ravindra Shobhane' on the occasion.
27 January 2024



SCAN TO WATCH

## Reception for NCC Cadets

नवी दिल्ली येथे प्रजासत्ताक दिन शिबिरात सहभाग घेतलेल्या महाराष्ट्र एन सी सी कॅडेटसच्या सन्मानार्थ राज्यपाल रमेश बैस यांनी स्वागत समारोह आयोजित केला होता. कार्यक्रमाला महाराष्ट्र एनसीसीचे अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल योगेंद्र सिंह, कर्नल एम. देवैया मुथप्पा, ब्रिगेडियर विक्रांत कुलकर्णी तसेच तिन्ही सैन्य दलातील अधिकारी व १२२ कॅडेट्स उपस्थित होते.
०१ फेब्रुवारी २०२४

Governor Ramesh Bais hosted a Reception for the NCC Cadets who participated in the All India Republic Day Parade 2024 at Raj Bahvan, Mumbai. Additional Director General NCC Maharashtra Maj. Gen. Yogendra Singh, Col. M. Devaiah Muthappa, Brig. Vikrant Kulkarni and other officers were present.
01 February 2024



SCAN TO WATCH

# ‘इंटरनॅशनल होलोकॉस्ट रेमेब्रन्स डे’

# Governor attends International Holocaust Remembrance Day

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात मारल्या गेलेल्या लाखो ज्यू धर्मीय लोकांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित 'इंटरनॅशनल होलोकॉस्ट रेमेब्रन्स डे' निमित्त मुंबईतील ज्यू धर्मियांचे प्रार्थनास्थळ असलेल्या केनिसेथ इलियाहु सिनेगॉग येथे राज्यपाल रमेश बैस यांच्या उपस्थितीत प्रार्थना सभा संपन्न झाली. यावेळी अमेरिकेचे मुंबईतील वाणिज्यदूत माईक हँकी, जर्मनीचे वाणिज्यदूत एकिम फैबिग, इस्रायलचे वाणिज्यदूत कोबी शोशानी, विविध देशांचे वाणिज्यदूत, जेकब ससून ट्रस्टचे अध्यक्ष व ज्यू समाजाचे नेते सॉलोमन सोफर तसेच ज्यू समाज बांधव उपस्थित होते.

२९ जानेवारी २०२४

**SCAN TO WATCH**

Maharashtra Governor Ramesh Bais attended a prayer meeting organised by the Jewish Prayer House 'Keneseth Eliyahoo Synagogue' in Mumbai on the occasion of the International Holocaust Remembrance Day. The Holocaust Day is observed to pay respects to the nearly 6 million Jews killed in Europe during and after the Second World War. Consul General of the United States of America in Mumbai Mike Hankey, Consul General of Germany Achim Fabig, Consul General of Israel in Mumbai Kobbi Shoshani, Chairman of the Jacob Sassoon's Trust Solomon Sopher, members of the Jewish community and diplomats from various countries were present.

29 January 2024





# Programmes

## Maharashtra State Art Exhibition

महाराष्ट्र राज्य कला संचालनालयातर्फे आयोजित ६३ व्या महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनाचे (कलाकार विभाग) उदघाटन राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते जहांगीर कलादालन येथे पार पडले. यावेळी राज्यपालांच्या हस्ते जाहिरात व डिझाईन क्षेत्रातील ज्येष्ठ कलाकार अरुण पद्मनाभ काळे यांना 'कै. वासुदेव गायतोंडे कला जीवन गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. धातुकला क्षेत्रातील ज्येष्ठ कलाकार विवेकानंद दास यांना ६३ वा महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन कलाकार विभागातील ज्येष्ठ कलाकार पुरस्कार देण्यात आला. यावेळी दृश्य कला क्षेत्रातील १५ युवा कलाकारांना देखील सन्मानित करण्यात आले.
**१३ फेब्रुवारी २०२४**

The 63rd Maharashtra State Art Exhibition organized by the Directorate of Arts, Government of Maharashtra was inaugurated by Governor Ramesh Bais at Jehangir Art Gallery in Mumbai. The Governor presented the 'Late Vasudeo Gaitonde Kala Jeevan Gaurav Award' to senior graphic designer Arun Padmanabh Kale for his contribution to the field of advertising. Senior metal artist Vivekananda Das was also given the '63rd Maharashtra State Senior Artist award'. Fifteen artists from the field of Visual Art were also honoured.
13 February 2024

**SCAN TO WATCH**



## Bombay Art Society Exhibition

राज्यपाल रमेश बैस यांनी जहांगीर कलादालन मुंबई येथे बॉम्बे आर्ट सोसायटीच्या १३२ व्या अखिल भारतीय वार्षिक कला प्रदर्शनाचे उदघाटन केले. यावेळी ललित कला अकादमीचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ शिल्पकार दिवंगत डॉ उत्तम पाचारणे यांना सोसायटीचा 'रुपधर जीवन गौरव पुरस्कार' मरणोपरांत प्रदान करण्यात आला.
**२७ फेब्रुवारी २०२४**

Maharashtra Governor Ramesh Bais inaugurated the 132nd edition of the All India Annual Art Exhibition of the Bombay Art Society at Jehangir Art Gallery Mumbai. Former Chairman of Lalit Kala Academy and well known sculptor Dr Uttam Pacharne was given the 'Roop Dhar Lifetime Achievement Award' posthumously.
27 February 2024

**SCAN TO WATCH**



# राज्यपालांच्या उपस्थितीत भारतीय रंग महोत्सवाचे उदघाटन
# Governor inaugurates Bharat Rang Mahotsav

राज्यपाल रमेश बैस यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय नाट्य विद्यालयातर्फे आयोजित २५ व्या भारतीय रंग महोत्सव 'भारंगम'चे उदघाटन एनसीपीए मुंबई येथे संपन्न झाले. यावेळी स्वानंद किरकिरे यांनी लिहिलेल्या 'भारंगम' महोत्सव गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. उदघाटन सत्राला राष्ट्रीय नाट्य विद्यालयाचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ अभिनेते परेश रावल, 'भारंगम' महोत्सवाचे ब्रँड ऍम्बॅसेडार पंकज त्रिपाठी, ज्येष्ठ अभिनेते रघुवीर यादव, राष्ट्रीय नाट्य विद्यालयाचे संचालक चित्तरंजन त्रिपाठी आदी उपस्थित होते. एकूण २२ दिवस १५ शहरांमध्ये चालणाऱ्या या नाट्य महोत्सवात १५० नाटकांचे सादरीकरण होणार आहे.
०१ फेब्रुवारी २०२४

**SCAN TO WATCH**

Maharashtra Governor Ramesh Bais presided over the inauguration ceremony of the 25th Bharat Rang Mahotsav 'Bharangam' organized by the National School of Drama at NCPA Mumbai. The Festival began with the group rendition of the 'Bharangam' Festival song penned by lyricist Swanand Kirkire. Chairman of National School of Drama and senior actor Paresh Rawal, Brand Ambassador of 'Bharangam' festival Pankaj Tripathi, senior actor Raghubir Yadav, Director of National School of Drama Chittaranjan Tripathi, eminent personalities from theatre, critics and alumni of NSDwere present.
01 February 2024






# जैन विश्वभारती विद्यापीठाचा दीक्षांत समारोह संपन्न
# Governor presides over Convocation of Jain Vishwa Bharti

राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत जैन विश्वभारती इन्स्टिट्यूट या राजस्थानातील अभिमत विद्यापीठाचा चौदावा दीक्षांत समारोह वाशी येथील सिडको प्रदर्शन केंद्र येथे संपन्न झाला.

कार्यक्रमाला जैन तेरापंथ संप्रदायाचे प्रमुख आचार्य महाश्रमण, जैन विश्वभारती विद्यापीठाचे कुलपती तथा केंद्रीय विधी व न्याय राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल, विद्यापीठाचे कुलगुरु बच्छराज दुगड, जैन विश्वभारतीचे अध्यक्ष अमरचंद लुंकड प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी आयसीआयसीआय बँकेचे माजी अध्यक्ष के.वी. कामत तसेच वेद व जैन शास्त्राचे अभ्यासक प्रा. दयानंद भार्गव यांना मानद डिलीट पदवी प्रदान करण्यात आली.
१९ फेब्रुवारी २०२४

**SCAN TO WATCH**

Maharashtra Governor Ramesh Bais presided over the 14th Annual Convocation of the Jain Vishwa Bharti Deemed University at CIDCO Convention Centre, Vashi, Navi Mumbai.

Head of the Jain Terapanth Acharya Mahashraman, Chancellor of Jain Vishva Bharati University and Union Minister of State (I/C) for Law and Justice Arjun Ram Meghwal, Vice Chancellor of the University Prof. Bachchharaj Dugad and President of Jain Vishwa Bharti Amarchand Lunkad were prominent among those present on the occasion.

The Governor conferred Honorary D.Litt. (Honoris Causa) on former CEO of ICICI Bank K. V. Kamath and renowned Sanskrit and Jain scholar Prof. Dayanand Bhargava on the occasion. 19 February 2024





## Bangladesh Youth Delegation

भारत व बांगलादेशातील नागरिकांमध्ये परस्पर सामंजस्य, मैत्रीपूर्ण संबंध तसेच सहकार्याची भावना वाढविण्याच्या दृष्टीने भारतभेटीवर आलेल्या बांगलादेशातील १०० युवा प्रतिनिधींनी राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन मुंबई येथे भेट घेतली.

**१ मार्च २०२४**

A 100- member Youth Delegation of Bangladesh visiting India under the International Youth Exchange Programme met Maharashtra Governor Ramesh Bais at Raj Bhavan, Mumbai.

01 March 2024

## India Meteorological Department

भारतीय हवामान खाते स्थापनेच्या १५० व्या वर्षात पदार्पण करीत आहे. या निमित्त नागपूर येथील प्रादेशिक हवामान केंद्रातर्फे वर्षभर चालणाऱ्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या कार्यक्रमांचा आरंभ राज्यपाल रमेश बैस यांच्या दूरस्थ उपस्थितीत संपन्न झाला.

**६ मार्च २०२४**

Maharashtra Governor Ramesh Bais presided through online mode, the launch of the year long celebrations of the 150th anniversary of the establishment of India Meteorological Department organized by Regional Meteorological Centre in Nagpur. Dr. Mrityunjay Mohapatra, DG India Meteorological Department, M L Sahu, Dy D G, Regional Meteorological Centre, Nagpur, scientists, senior officers and staff of Meteorological Department were present.

6 March 2024







# Programmes

## Hearing aid to children

जागतिक श्रवण दिवसानिमित्त राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण सभागृह मुंबई येथे गरीब आणि गरजू कुटुंबातील कर्णबधिर मुलामुलींना श्रवणयंत्रांचे वाटप करण्यात आले. पार्श्वगायिका अनुराधा पौडवाल यांच्या पुढाकाराने सूर्योदय फाउंडेशनने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.
३ मार्च २०२४

Maharashtra Governor Ramesh Bais distributed hearing aids to children with hearing impairments coming from poor and needy families on the occasion of the World Hearing Day in Mumbai. The Distribution of Hearing Aid with Ear Mould was organized at the instance of playback singer Anuradha Paudwal by Suryodaya Foundation.
3 March 2024

SCAN TO WATCH

## Wheelchairs to Divyang children

शांता सिद्धी चॅरिटेबल ट्रस्ट आणि ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ फिजिकल मेडिसिन अँड रिहॅबिलिटेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित कार्यक्रमामध्ये राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते दिव्यांग मुलामुलींना व्हीलचेअरचे वाटप करण्यात आले. यावेळी शांता सिद्धी चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष आणि प्रसिद्ध मज्जा विकार तज्ज्ञ डॉ प्रेमानंद रमाणी, ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ फिजिकल मेडिसिन अँड रिहॅबिलिटेशनचे संचालक डॉ अनिल कुमार गौर, शांता सिद्धी चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त डॉ.तुषार रेगे, तसेच संस्थेचे पदाधिकारी व निमंत्रित उपस्थित होते.
९ मार्च २०२४

Maharashtra Governor Ramesh Bais distributed Wheel Chairs to physically handicapped children at a programme organized by Shanta Siddhi Charitable Trust in association with the All India Institute of Physical Medicine and Rehabilitation (AIIPMR) at Haji Ali, Mumbai.
9 March 2024

SCAN TO WATCH





# राज्यपालांची विकसित गाव खोमारपाडा येथे भेट
# Governor visits 'Khomarpada' in Palghar

राज्यपाल रमेश बैस यांनी विक्रमगड तालुका, पालघर जिल्ह्यातील विकसित गाव खोमारपाडा येथे भेट देऊन विकासकामांची पाहणी केली तसेच ग्रामस्थांशी संवाद साधला. यावेळी खासदार राजेंद्र गावित, ज़िल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, मनरेगाचे संचालक नंद कुमार, पालघरचे जिल्हाधिकारी गोविंद बोडके आदी उपस्थित होते.
**७ मार्च २०२४**

Maharashtra Governor Ramesh Bais visited the Viksit Gaon 'Khomarpada' in Vikramgad Taluka of Palghar District and inspected various developmental projects. The Governor also interacted with the villagers on the occasion.
Member of Parliament Rajendra Gavit, ZP President Prakash Nikam, Director MNREGA Nand Kumar, Palghar Collector Govind Bodke were among those present.
7 March 2024





# Programmes

## Teachers' Conference

राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत लोणावळा येथे 'वेध प्रोफेशनल लर्निंग कम्युनिटी' तर्फे आयोजित शिक्षक संमेलन संपन्न झाले. यावेळी राज्यपालांनी शिक्षकांशी संवाद साधला. कार्यक्रमाला मिशन मनरेगाचे संचालक नंद कुमार, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल, 'वेध'चे समन्वयक निलेश घुगे व राज्यातील शाळांचे प्राचार्य, शिक्षक व शिक्षणाधिकारी उपस्थित होते.
१० मार्च २०२४

Maharashtra Governor Ramesh Bais addressed a Conclave of teachers organized by 'Vedh Professional Learning Community' at Lonavala in Pune. Director of Mission MGNREGA Nand Kumar, Principal Secretary School Education Ranjit Singh Deol, Coordinator of 'Vedh' Nilesh Ghuge, teachers from across the State, education officers and invitees were present.
10 March 2024

## GEC Raipur Alumni Meet

रायपूर (छत्तीसगड) येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय - राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था (GEC - NIT) या प्रसिद्ध संस्थेच्या माजी विद्यार्थी संस्थेच्या मुंबई शाखेच्या सदस्यांचे स्नेहसंमेलन महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत एकर्स क्लब, चेंबूर मुंबई येथे संपन्न झाले. या कार्यक्रमाला रायपुर जीईसी एनआयटी माजी विद्यार्थी संस्थेचे अध्यक्ष तसेच हिंदुस्थान कॉपरचे माजी व्यवस्थापकीय संचालक कैलास धर दिवान, मुंबई शाखेचे अध्यक्ष अनिल बंछोर तसेच माजी विद्यार्थी संस्थेचे सदस्य व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.
७ एप्रिल २०२४

The Alumni Meet of the Mumbai Branch of the Government Engineering College - National Institute of Technology (GEC - NIT) Raipur was held in presence of Maharashtra Governor Ramesh Bais at the Acres Club in Chembur, Mumbai. Raipur GEC NIT Alumni Association President and former CMD of Hindustan Copper Kailash Dhar Diwan, Mumbai Branch President Anil Banchor and members of the Alumni Association and their families attended the event.
7 April 2024






## National Defence College

नॅशनल डिफेन्स कॉलेज नवी दिल्ली येथे 'राष्ट्रीय सुरक्षा व रणनीती' या विषयावरील अभ्यासक्रमात सहभागी होत असलेल्या नागरी सेवा व सैन्यदलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या एका शिष्टमंडळाने महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली.

यावेळी नॅशनल डिफेन्स कॉलेजचे वरिष्ठ संचालक रिअर एडमिरल संजय सचदेवा तसेच नायजेरिया, सौदी अरेबिया, इजिप्त, भूतान व कझाकस्तान या मित्र देशांसह अभ्यासक्रमात सहभागी असलेले १५ अधिकारी उपस्थित होते.
२१ मार्च २०२४

A group of 15 senior officers of Civil and Military Services undergoing a training on 'National Security and Strategic Studies' at National Defence College in New Delhi called on Governor Ramesh Bais at Raj Bhavan Mumbai.

Senior Director of the National Defence College Rear Admiral Sanjay Sachdeva and civil and military officers from various countries were present. The group consisted of five officers from friendly countries like Nigeria, Saudi Arabia, Egypt, Kazakhstan and Bhutan.
21 March 2024

## Merchant Navy Week

राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत ६१ व्या राष्ट्रीय समुद्री दिवस (नॅशनल मेरीटाईम डे) तसेच सप्ताहाचे (मर्चंट नेव्ही वीक) राजभवन येथे उदघाटन करण्यात आले. कार्यक्रमाला शिपिंग कॉर्पोरेशनचे अध्यक्ष कॅप्टन बी के त्यागी, नॅशनल मेरीटाईम डे सेलिब्रेशन समितीचे अध्यक्ष अतुल उबाळे, उपमहासंचालक डॉ पांडुरंग राऊत, शिप सर्व्हेयर अनिरुद्ध चाकी, नॉटिकल सर्व्हेयर कॅप्टन मनीष कुमार, शिपिंग मास्तर मुकुल दत्ता व इतर अधिकारी तसेच जहाज संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.
३० मार्च २०२४

Maharashtra Governor Ramesh Bais inaugurated the 61st National Maritime Day and Merchant Navy Week - 2024 at Raj Bhavan Mumbai. The Merchant Navy Week was organized by the Shipping Corporation of India and the National Maritime Day Celebrations Committee. Director General of Shipping Shyam Jagannathan affixed the maritime day badge on the apparel of the Governor.
30 March 2024





# राज्यपालांच्या हस्ते रत्न आभूषण निर्यात पुरस्कार प्रदान
# Governor presents Gem & Jewellery Export Promotion Awards

राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते तसेच रिलायन्स समूहाचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांच्या प्रमुख उपस्थितीत भारत रत्न आणि आभूषण निर्यात संवर्धन परिषदेतर्फे देण्यात येणारे ५० वे रत्न व आभूषण निर्यात पुरस्कार हॉटेल ट्रायडेंट मुंबई येथे विविध निर्यातकांना समारंभ पूर्वक प्रदान करण्यात आले.

यावेळी राज्यपालांच्या हस्ते प्रसिद्ध हिरे व्यावसायिक रसेल मेहता, अध्यक्ष, रोझी ब्लू, यांना रत्न आणि आभूषण निर्यात परिषदेचा 'जीवन गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

३० मार्च २०२४

**SCAN TO WATCH**

The 50th Gem and Jewelry Export Awards instituted by the India Gem & Jewellery Export Promotion Council were presented to various exporters at a glittering ceremony at Hotel Trident Mumbai. Maharashtra Governor Ramesh Bais presented the awards in presence of Reliance Group Chairman Mukesh Ambani. Diamentaire Russell Mehta, Managing Director of Rosy Blue was presented with the Life Time Achievement Award of the Gems and Jewellery Export Promotion Council. President of the Gem and Jewellery Export Promotion Council Vipul Shah, Vice President Kirit Bhansali, Award Committee Convener Milan Choksi, Bharat Diamond Bourse President Anup Mehta were prominent among those present.

30 March 2024






## Release of Dr Narendra Jadhav's book




भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून राजभवन येथे आयोजित एका कार्यक्रमात राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते अर्थतज्ज्ञ, माजी कुलगुरु तसेच रिझर्व्ह बँकेचे माजी मुख्य सल्लागार डॉ नरेंद्र जाधव यांच्या 'आमचा बाप आन आम्ही' या पुस्तकाच्या २०० व्या आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले.
१४ एप्रिल २०२४

Maharashtra Governor Ramesh Bais released the 200th special edition of the book 'Aamcha Baap Aan Amhi' authored by economist, former Vice Chancellor and former Chief Economist RBI Dr Narendra Jadhav at Raj Bhavan Mumbai.
14 April 2024

## Registrars of Indian Institutes of Technology

देशभरातील सर्व भारतीय प्रौद्योगिकी संस्था - आयआयटीच्या कुलसचिवांच्या दोन दिवसांच्या परिषदेला राज्यपाल रमेश बैस यांनी राजभवन मुंबई येथे संबोधित केले. 'जागतिक दर्जाच्या विद्यापीठ प्रशासनाची निर्मिती' या विषयावर मुंबई आयआयटीच्या पुढाकाराने या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.
१६ मार्च २०२४

Maharashtra Governor Ramesh Bais addressed the Conference of the Registrars of Indian Institutes of Technology from across the country at Raj Bhavan Mumbai. The Registrars were in Mumbai to attend a two day Conference on the theme 'Building World Class University Administration' organized by IIT Mumbai.
16 March 2024



# राज्यपालांचे शिवरायाला अभिवादन
# Governor pays floral tributes to Shivaji Maharaj

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राज्यपाल रमेश बैस यांनी शिवाजी पार्क मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी मुंबईचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई महानगर पालिकेचे आयुक्त तथा प्रशासक इक्बाल सिंह चहल, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीचे किशन जाधव आदी उपस्थित होते.
**१९ फेब्रुवारी २०२४**

Maharashtra Governor Ramesh Bais offered floral tributes to the equestrian statue of Chhatrapati Shivaji Maharaj at Shivaji Park Mumbai on the occasion of Shiv Jayanti.
19 February 2024

**SCAN TO WATCH**





# जिल्ह्यांना भेटी

# Visits to Districts

# राज्यपालांची काळाराम मंदिराला भेट
# Governor visits the Kalaram Mandir

राज्यपाल रमेश बैस यांनी नाशिक येथील काळाराम मंदिराला भेट देऊन प्रभू श्रीरामाचे दर्शन घेतले तसेच पूजा व आरती केली. काळाराम मंदिर संस्थानचे मुख्य महंत आचार्य महामंडलेश्वर सुधीरदास महाराज व विश्वस्त धनंजय पुजारी यांनी राज्यपालांचा प्रभू श्रीरामाची प्रतिमा, शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.
०५ जानेवारी २०२४

Governor of Maharashtra Ramesh Bais visited the Kalaram Mandir in Nashik and performed puja and aarti. The Chief Mahant Acharya Mahamandaleshwar Sudhirdas Maharaj and Trustee Dhananjay Pujari of Kalaram Mandir were welcomed the Governor. State Sports and Youth Welfare Minister Sanjay Bansode was also present.
05 January 2024







# इतर राज्यांना भेटी

# Visits to other States

# राज्यपालांच्या उपस्थितीत मनवा कुर्मी क्षत्रिय समाजाचे अधिवेशन संपन्न

# Chhattisgarh Manwa Kurmi Kshatriya Samaj Sammelan

छत्तीसगड मनवा कुर्मी क्षत्रिय समाजाचे ६ वें अधिवेशन राज्यपाल रमेश बैस तसेच छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णुदेव साय यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्तीसगड येथील बलौदाबाजार- भाटापारा जिल्ह्यातील सेमराडीह येथे संपन्न झाले. यावेळी उभयतांनी सामुहिक विवाह सोहळयाला उपस्थित राहून नव विवाहित जोडप्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री अरुण साव, मंत्री टंक राम वर्मा, आमदार व्यास कश्यप, चोवाराम वर्मा, केंद्रीय अध्यक्ष छगम कुमी समाज, स्थानिक लोक प्रतिनिधी तसेच छत्तीसगड मनवा कुर्मी क्षत्रिय समाजाचे पदाधिकारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

**३१ डिसेंबर २०२३**

Governor Ramesh Bais presided over the 6th Chhattisgarh Manwa Kurmi Kshatriya Samaj Sammelan at Balauda Bazaar Bhatapara Chhatisgarh. Chief Minister, Chhattisgarh Vishnu Dev Say, Dy. Chief Minister, Chhattisgarh Arun Sao, MLA, Tank Ram Verma, Chovaram Verma, Kendriya Adhyaksh, Manva Kurmi Kshatriya Samaj and others were present. The Governor and Chhattisgarh CM blessed the newly wed couples on the occasion.

31 December 2023




# राज्यपालांची मेहंदीपूर बालाजी मंदिराला भेट
# Governor visits Mehandipur Balaji Temple

राज्यपाल रमेश बैस यांनी राजस्थानचे राज्यपाल कलराज मिश्र यांचे समवेत राजस्थान येथील प्रसिद्ध मेहंदीपूर बालाजी (हनुमान) मंदिरास (ता. सिकराय, जि. दौसा) भेट देऊन दर्शन घेतले.
२२ एप्रिल २०२४

Maharashtra Governor Ramesh Bais, accompanied by Rajasthan Governor Kalraj Mishra visited the famous Mehandipur Balaji (Hanuman) Temple at Sikrai, Dist Dausa in Rajasthan. This is a famous Hanuman temple in the region.
22 April 2024





# राजभवन परिवार

# Raj Bhavan Family







# राज्यपालांच्या हस्ते श्रीराम पंचायतन मूर्तींची स्थापना

# Governor performs the consecration of Shri Ram Darbar in Raj Bhavan

अयोध्या येथे प्रभू श्री राम मंदिर प्रतिष्ठापना समारोहाचे औचित्य साधून महाराष्ट्र राजभवन येथील श्री गुंडी देवी मंदिर परिसरात राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते श्रीराम पंचायतन मूर्तींची स्थापना करण्यात आली. राज्यपाल बैस यांनी पत्नी रामबाई बैस यांचेसह प्रभू रामाची आरती केली व उपस्थितांसह नामगजरात भाग घेतला.
२२ जानेवारी २०२४

Maharashtra Governor Ramesh Bais performed the consecration of the Shri Ram Darbar in the Sri Gundi Mandir Complex in Raj Bhavan. The consecration ceremony was organised to coincide with the consecration of the Shri Ram Temple in Ayodhya. The Governor accompanied by his wife Rambai Bais performed the aarti.
22 January 2024

**SCAN TO WATCH**


।। जय सियाराम ।।







# राज्यपालांच्या उपस्थितीत पुणे येथे ध्वजारोहण संपन्न
# Governor celebrates Independence Day

राज्यपाल रमेश बैस यांनी पुणे येथील कौन्सिल हॉल येथे स्वातंत्र्याच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त ध्वजारोहण केले. यावेळी जेष्ठ प्रशासकीय व पोलीस अधिकारी, गणमान्य नागरिक व निमंत्रित उपस्थित होते. यावेळी राज्यपालांनी उपस्थितांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या व लहान मुलांशी संवाद साधला.
१५ ऑगस्ट २०२३

Maharashtra Governor Ramesh Bais hoisted the national tricolor on the occasion of 76th anniversary of the Independence Day at Council hall in Pune. Senior officers of the state administration, police, citizens and their family members were present in large numbers. The Governor extended Independence Day greetings to the people and interacted with the children on the occasion.
15 August 2023



# स्वातंत्र्यदिनानिमित्त राजभवन पुणे येथे स्वागत समारोह

# At Home Reception at Pune Raj Bhavan

देशाच्या स्वातंत्र्य दिनाच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त राज्यपाल रमेश बैस यांनी गणेशखिंड पुणे येथील राजभवन येथे प्रथेनुसार चहापान व स्वागत समारंभाचे आयोजन केले होते. चहापानाला राज्यपालांच्या पत्नी रामबाई बैस, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, सैन्य दलातील वरिष्ठ अधिकारी, वरिष्ठ प्रशासकीय व पोलीस अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ सुरेश गोसावी, आदी उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ते गिरीश प्रभुणे, एमआयटी विश्व शांती केंद्राचे संस्थापक डॉ विश्वनाथ कराड, डॉ के एच संचेती, ज्येष्ठ अभिनेते डॉ मोहन आगाशे, दिग्दर्शक प्रवीण तरडे, गायक शौनक अभिषेकी, सलील कुलकर्णी, सावनी शेंडे व आर्या आंबेकर यांसह विविध क्षेत्रातील निमंत्रित उपस्थित होते.

**१५ ऑगस्ट २०२३**

Maharashtra Governor Ramesh Bais hosted the customary Reception, known as 'At Home' on the occasion of the 76th anniversary of India's Independence at Raj Bhavan in Ganeshkhind Pune. Smt.Rambai Bais, Guardian Minister Chandrakant Patil, senior army officers, senior civil service and police officers, Vice Chancellor of Savitribai Phule Pune University Dr. Suresh Gosavi and invitees were present.

15 August 2023





# At Home Reception at Pune Raj Bhavan


















# प्रजासत्ताक दिनानिमित्त राजभवन येथे स्वागत समारंभ


# Republic Day Reception at Raj Bhavan

देशाच्या ७५ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राज्यपाल रमेश बैस यांनी राजभवनाच्या हिरवळीवर निमंत्रितासाठी स्वागत समारंभ व चहापानाचे आयोजन केले. कार्यक्रमाला मुंबई भेटीवर आलेले संयुक्त राष्ट्र महासभेचे अध्यक्ष डेनिस फ्रान्सिस, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ निलम गोर्हे, माजी मुख्यमंत्री सुशील कुमार शिंदे, पार्श्व गायक उदित नारायण आदी उपस्थित होते.
२६ जानेवारी २०२४

The Governor of Maharashtra Ramesh Bais hosted the traditional reception and high tea for eminent invitees on the occasion of 75th Republic Day. President of United Nations General Assembly Dennis Francis, Deputy Speaker of Legislative Council Dr. Neelam Gorhe, former Chief Minister Sushil Kumar Shinde, Play back singer Udit Narayan and others were present.
26 January 2024

**SCAN TO WATCH**

# Republic Day Reception at Raj Bhavan









# राज्यपालांच्या हस्ते गणरायाची प्रतिष्ठापना

# Governor Ramesh Bais welcomes Lord Ganesha

गणेश चतुर्थी निमित्त राज्यपाल रमेश बैस यांनी राजभवन येथे आपल्या निवासस्थानी गणरायाची प्रतिष्ठापना केली. यावेळी राज्यपालांनी आपले कुटुंबीय तसेच राजभवनातील कर्मचारी व अधिकारी यांसह गणरायाची आरती केली.

१९ सप्टेंबर २०२३

Maharashtra Governor Ramesh Bais performed the puja and aarti of Lord Ganesha on the occasion of Ganesh Chaturthi at the Governor's Residence, Raj Bhavan, Mumbai. Family members of the Governor, officers and staff of Raj Bhavan joined the Governor in performing the aarti.

19 September 2023

**SCAN TO WATCH**





**Published by:**

**PR Branch**
**Governor's Secretariat**
**Raj Bhavan, Malabar Hill, Mumbai - 400035 | Tel. +91 22 23670098**
**Email: pro.rb-mh@nic.in**

**Photograph : Sachin Vaidya**